## प्रकरण तिसरे

# सावरकर आणि मॅझिनीचा

# राष्ट्रवाद

## प्रकरण तिसरे

## सावरकर आणि मॅझिनीचा राष्ट्रवाद

### सावकार आणि मॅझिनी :

स्वा. सावरकर आणि इटालियन स्वातंत्र्याचा प्रणेता जोसेफ मॅझिनी या दोहोंत राष्ट्रीय स्वातंत्र्याचे ध्येय, साधन, विचार, कार्यपध्दती इत्यादी बाबतीत बरेच साम्य असलेले दिसते. सावरकर कायद्याची पदवी मिळवावी या हेतूने इंग्लंडला गेले. पण हिंदी तरुणांत क्रांतीचे विचार भरवून भारतीय स्वातंत्र्याचा लढा लढवावा हा उद्देश ठेवून सावरकरांनी लंडनला गेल्यानंतर काही दिवसांतच राजकीय घडामोडीकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. राजकीय घडामोडीकडे लक्ष देत असतानाच त्यांच्या मनात इटलीचा स्वातंत्र्य प्रणेता जोसेफ मॅझिनी याच्या चरित्राच्या भाषांतराची कल्पना आली. भारतात असताना सावरकर "अभिनव भारत" च्या साप्ताहिक बैठकी-तून मॅझिनीवर भाषणे देत असत. ही भाषणे त्याक काळात प्रसिध्द झाले-ल्या श्री. ल.गो. थाणेकर यांनी लिहिलेल्या मॅझिनीच्या चरित्रावरून देत असत. तसेच "काळ" पत्रात प्रसिध्द झालेला मॅझिनीचा "तरुण इटली" वरील लेख त्यांच्या वाचनात आलेला होता. याशिवाय सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी मॅझिनीवर दिलेली भाषणे त्यांनी ऐकली होती.

इटली आणि भारत यांच्या परतंत्र अवस्थेत सावरकरांना बरेच साम्य दिसून आल्यानंतर त्यांनी मॅझिनी आणि त्याचे राजकीय तत्वज्ञान यावर "अभिनव भारताच्या" साप्ताहिक बैठकींतून, शाळा, महाविद्यालयांतून अनेक भाषणे दिली. त्याच दरम्यान त्यांना असे समजले की, मॅझिनीने स्वत:

इटालियन भाषेत लिहिलेल्या आत्मवृताचे आणि क्रांतीकारी लेखांचे इंग्रजी भाषेत भाषांतरीत केलेले सहा भाग प्रसिध्द झाले आहेत. परंतु भारतात असेपर्यंत ते त्यांना मिळाले नाहीत. म्हणून इंग्लंडला गेल्यानंतर त्यांनी "इंडिया हाऊस" चे व्यवस्थापक श्री मुखर्जी यांच्याकडून मॅझिनीचे चरित्र वाङ्मय मिळविले.

मॅझिनीच्या चरित्र वाङ्मयाचे सहाही भाग सावरकरांच्या हाती येताच त्यांनी ते मोठया जिज्ञासेने वाचून काढले. मॅझिनीचे चरित्र वाङ्मय वाचत असतानां, स्वा. सावरकर लिहितात की, "मी जसजसे मॅझिनीचे चरित्र वाङ्मय वाचत गेलो तसतसे मला आढळून येत चालले की, मी भारतात असताना गुप्त संस्थांतून जे जे क्रांतीकारक विचारांचे मार्गदर्शन माझ्या सहका-यांना करीत होतो त्यांत आणि मॅझिनीने "तरुण इटली" साठी अगदी पहिल्यापासून जे जे क्रांतीकारी मार्गदर्शनाचे लेख लिहिले होते, त्यात विलक्षण साम्य मला आढळले. गुप्त संस्थांच्या कार्यक्रमाचे प्रचारक आणि आचारक असे दोन भाग असले पाहिजेत, उघड आणि गुप्त असे त्या विभागांना अनुसरुन दोन कार्यक्रम आखले पाहिजेत. परतंत्र राष्ट्रातील स्वातंत्र्यवाद्यांना उघड आणि गुप्त असे दोन्ही मार्ग स्वातंत्र्यासाठी स्वीकारावे लागतात. हे आपण प्रतिपादीत असलेले सूत्रही मॅझिनीच्या त्या सहा भागांतून विखुरलेले आढळले. सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा स्वीकार केल्याशिवाय केवळ नि:शस्त्र प्रतिकाराच्या मार्गाने राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळणे शक्य नाही आणि तरीही जनतेत प्राथमिक राजकीय जागृती करण्यासाठी नि:शस्त्र चळवळी केल्या पाहिजेत, हा आपला ठाम सिध्दांत यांत पूर्णत्वाने प्रतिपादन केलेला आढळला. [१]

सावरकरांच्या मते, इंग्लंडचे शत्रु असलेल्या आशिया, युरोप आणि अमेरिकेतील राष्ट्रांशी परराष्ट्र संबंध जोडले पाहिजेत, गनिमीकावा युध्द

पध्दतीने शत्रूच्या प्रत्येक केंद्रावर हल्ला केला पाहिजे, साधेल तशी वैयक्तिक वा सामुहीक कत्तली केल्या पाहिजेत, इंग्रज सत्तेने उभारलेल्या लाखो स्वदेशी सैनिकांना गुप्तपणे क्रांतीसाठी प्रवृत केले पाहिजे, शक्य तितके स्थानिक, वैयक्तिक आणि सैनिकी उठाव घडवून आणाले पाहिजेत, इंग्लंड बरोबर कोणाचे युध्द सुरू होताच तिकडे जाऊन त्यांना मदत करून इंग्रज सत्तेविरूध्द उठाव घडवून आणला पाहिजे, एक उठाव अयशस्वी झाला तर संधी मिळताच दुसरा उठाव केला पाहिजे. अशा प्रकारे सतत सशस्त्र उठाव करून इंग्रज सत्ता खिळखिळी केली पाहिजे. अशा विविध उपायांनी केल्या जाणाऱ्या सर्वकष क्रांतीयुध्दाचा जो कार्यक्रम अभिनव भारतीय क्रांतीकारकांपुढे ठेवीत असत. आणि सामान्य जनतेला इंग्रज सत्ते-विरूध्द भडकवून देण्यासाठी उघड उघड सभांतील भाषणातून जे शक्यतो कायद्याच्या पकडीत सापडू नये म्हणून जे अप्रत्यक्ष कोटिक्रम करीत, त्याच कार्यक्रमांचा आणि कोटिक्रमांचा प्रबळ पुरस्कार मॅझिनीने केला. काही ठिकाणी तर सावरकर उच्चारीत होते त्याच वाक्यात ती भाषणे मॅझिनी-च्या या सहा भागात विखुरलेली त्यांना आढळली. त्यामुळे इटलीच्या स्वातं-त्र्यासाठी मॅझिनीने "तरुण इटली" द्वारे स्वीकारलेली क्रांतीकारक विचार-सरणी आणि कार्यक्रम यांत आणि भारतीय स्वातंत्र्यासाठी "अभिनव भारत" द्वारे स्वीकारलेली क्रांतीकारक विचारसरणी आणि कार्यक्रम ह्यात तंतोतंत साम्य आहे, असे सावरकरांना आढळून आले. ते पुढे म्हणतात की, मॅझि-नीच्या सशस्त्र क्रांतीच्या विचाराने आणि कार्यक्रमानेच इटली स्वतंत्र झाली आहे. त्यामुळे त्यांनी स्वीकारलेल्या सशस्त्र क्रांतीच्या मार्गानेच भारतीय स्वातंत्र्य मिळविता येईल असा दृढ आत्मविश्वास त्यांना वाटत होता. म्हणून मॅझिनीचे लेख जर भारतीयांच्या वाचनात आले तर "अभिनव भारत" मधील शतावधी सहकाऱ्यांचा क्रांतीच्या विचारांवरील विश्वास वाढल्याशिवाय राहणार नाही, असे सावरकरांना वाटू लागले. [२]

भारतीय स्वातंत्र्यासाठी सावरकरांनी आपल्या क्रांतीकारक विचारांना मॅझिनीच्या क्रांतीकारक विचारांचा भक्कम आधार देऊन राष्ट्रीय स्वातंत्र्याचे आंदोलन सुरु ठेवले. त्यांच्या मते, सशस्त्र क्रांतीच्या मार्गानेच राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळेल. तेव्हा भारतीयांनी ह्याच मार्गाचा स्वीकार करुन इंग्लंडशी स्वातंत्र्य मिळेपर्यंत सतत क्रांती युध्द करावे. यासाठी भारतीयांना क्रांती-युध्दाची प्रेरणा देणारा जोसेफ मॅझिनी "आत्मचरित्र व राजकारण" हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात मॅझिनीचे आत्मवृत व राष्ट्रीय स्वातंत्र्याविषयी प्रेरणा देणारे लेख आहेत.

सावरकरांना वाटणारे मॅझिनीचे महत्व :

इटालियन स्वातंत्र्याचा प्रणेता जोसेफ मॅझिनीबद्दल सावरकरांना विशेष महत्व वाटत होते. त्यांच्या मते, ज्या महान द्रष्टयाच्या विचारांने प्रभावित होऊन इटलीने ऑस्ट्रियाच्या गुलामगिरीतून आपली मुक्तता करुन घेतली, त्या मॅझिनीचे चरित्र भारतालाच नव्हेतर जगातील प्रत्येक देशभक्ताला प्रेरणादायी वाटणारे आहे. कारण केवळ आपल्या स्वत:च्याच देशाला स्वतंत्र करणे हे मॅझिनीचे ध्येय नव्हते, तर आपण स्वतंत्र होताच दुस-यांना आपण स्वतंत्र केले पाहिजे, अशा उदात्त भूमिकेतून मॅझिनीने आपला स्वतंत्रतेचा लढा सुरु ठेवला होता. अठराशे सत्तावनच्या भारतीय स्वातंत्र्य युध्दाच्या वेळी भारतात येऊन येथील क्रांतीवीरांना सक्रीय मदत करण्याचा बेत मॅझिनी आणि ग्यारिबाल्डी यांनी केला होता. परंतु त्याच वेळी इटलीत पुन्हा स्वातंत्र्य युध्द सुरु झाल्याने त्यांना भारतात येणे शक्य झाले नाही. [3]

मॅझिनीच्या विचारांचा प्रभाव सुरेंद्रनाथ बॅनर्जी, बिपिनचंद्र पाल,

लाला लजपतराय इत्यादींवर पडला. परंतु सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि बिपिनचंद्र पाल यांना मॅझिनीचा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा क्रांतीचा मार्ग मान्य नव्हता. म्हणून बॅनर्जी आपल्या मॅझिनीवरील प्रत्येक भाषणात भारतीयांना बजावून सांगत की, "मॅझिनीप्रमाणे ज्वलंत देशभक्त बना, उत्कट त्यागी बना, मानवतेचे उपासक बना, मात्र मॅझिनीच्या क्रांतीकारक आणि गुप्तमंडळे स्थापन करण्याच्या मार्गावर चुकूनसुध्दा पाऊल टाकू नका."

मॅझिनीचे चरित्र, त्याचे तत्वज्ञान स्वातंत्र्यवाद्यांच्या पुढे ठेवतांना सावरकरांना बॅनर्जींच्या या मर्यादा पाळण्याची आवश्यकता वाटली नाही. त्यांच्या मते, "गुप्तमंडळे" आणि "सशस्त्र क्रांती" हा तर मॅझिनीच्या चरित्राचा महत्त्वाचा भाग असून तोच वगळला तर राहिलेला मॅझिनी निष्प्राण होय. सावरकर पुढे म्हणतात की, प्रबळ शक्ती सामर्थ्याने सुसज्ज असलेल्या परकीय सत्तेच्या जुलमाखाली सतत भरडल्या जाणाऱ्या परतंत्र देशाने स्वातंत्र्यासाठी गुप्तमंडळे स्थापन करण्याचा, क्रांतीचा आणि गनिमीकाव्याने युध्द करण्याचा मार्ग स्वीकारला तरच राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळेल. अशा प्रकारे पारतंत्र्यात असणाऱ्या राष्ट्राने स्वातंत्र्यप्राप्तीसाठी काय करावे याबाबत मॅझिनीचे विचार सांगताना भारतीयांनी स्वातंत्र्या-साठी मॅझिनीचा सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारावा अशी स्पष्ट पण सूचक प्रेरणा सावरकरांनी दिली.

मॅझिनीच्या सशस्त्र क्रांतीच्या तत्वज्ञानाचे महत्व विशद करण्यापूर्वी इतर भोंगळ (निःशस्त्र) तत्वज्ञानाचे दोष लक्षात आणून देण्यासाठी सावरकर म्हणतात की, "आग लागली असता त्यावर पाणी ओतावे" हे सर्वमान्य तत्व मुद्दाम फेटाळून त्या आगीवर घृताचा (तुपाचा) वर्षाव करून ती विझते की नाही म्हणून संथगतीने प्रयत्न करणाऱ्या मूर्खांना त्या आगीच्या डोंबात

भस्म होण्याशिवाय दुसरे काय बक्षीस मिळणार ? तेव्हा तशी स्थिती आपल्या देशाची होऊ नये म्हणून भारतीयांनी स्वातंत्र्यासाठी नि:शस्त्र प्रतिकाराऐवजी मॅझिनीचाच क्रांतीचा मार्ग स्वीकारावा. कारण ह्याच मार्गाने इटली स्वतंत्र झाला आहे. त्यांच्या मते, "आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी तरुण देशबंधूंनी राजकारणातील अंतिम व महत्त्वाचे सिध्दांत शिकावे, हे ज्ञान मिळविण्यास तरुण देशभक्तांना उत्साहक, दिव्य, प्रेमळ व उदात्त अशा राष्ट्रमंत्राची दीक्षा देण्यास मॅझिनीशिवाय कोणता गुरु सापडणार आहे." [४]

मॅझिनीने राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी लिहिलेल्या क्रांती लेखांचे महत्व विशद करताना सावरकर म्हणतात की, "मॅझिनीच्या क्रांती लेखांनी इटली-च्या दोन कोटी लोकांत स्वातंत्र्याचे चैतन्य आणले, या लेखांचे पाणी ग्यारिबाल्डीच्या तलवारीवर झळकले, या लेखांनी इटली देश स्वतंत्र झाला. तसेच सर्व परतंत्र राष्ट्रांना स्वतंत्र करण्याचे सामर्थ्य या लेखांत सामावलेले आहे. मॅझिनीचे हे लेख म्हणजे स्वतंत्रतेच्या अमृताचे झरे आहेत, या स्वतंत्रतेच्या वेदमंत्रामध्ये राष्ट्रीय स्वातंत्र्याची विलक्षण शक्ती आहे, या मंत्राचे स्मरण करून जर कोणी जुलमाच्या सापावर याचा प्रयोग केला तर त्या सापाचे विष उतरल्याशिवाय राहणार नाही." भारतीय स्वातंत्र्यवाद्यांना स्वतंत्रतेचे आवाहन करताना सावरकर म्हणतात की, मॅझिनीने राष्ट्रीय स्वातंत्र्याची ही तत्वे केवळ इटलीसाठीच सांगितलेली नाहीत, तर इटली ही केवळ निमित्त-मात्र असून ही राजकारणातील महान सत्ये सर्व मानवजातीसाठी निर्माण केलेली आहेत, हा स्वतंत्र सुधेचा मेघ सर्व संतप्त भूमिकांकडे वळला आहे.

मॅझिनीच्या उच्च नैतिक पायावर आधारीत असलेल्या राजनीतीचे महत्व सावरकरांनी पुढीलप्रमाणे विशद केले आहे. "तलवारीशिवाय

तत्वांचा जय होत नाही, म्हणून ती हातात धरणाऱ्या इटलीचे समर्थन करतांना, त्या तलवारीच्या अग्रभागी जर सत्याचे अधिष्ठान नसते तर त्या तलवारीला इटलीने स्पर्शही केला नसता." असे उद्गार मॅझिनीने काढले आहेत. म्हणून सावरकर लिहितात की, मॅझिनीचे राजकारण हे केवळ ऐहिक वा स्वार्थी प्रवृत्तीचे नव्हते, तसे असते तर त्या राजकारणाने प्रवृत्त झालेल्या देशभक्तांच्या मनांत इतक्या उदात्त प्रवृत्तीचा उदय झाला नसता. मॅझिनीचे राजकारण हे प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचे एकीकरण होते, त्याच्या राजकारणाची इमारत ही नीतीच्या पायावर उभारलेली होती, राजकारण हे परमेश्वरी कर्तव्य आहे असे त्याने स्पष्टरीतीने सिध्द केले.

सावरकरांच्या मते, मॅझिनीने राजकारणाचे उदात्त स्वरूप करून "राजकारणाला धर्म आहे आणि धर्माला राजकारण आहे" हा महान सिध्दांत मांडला. या सिध्दांतात त्याने इटालियन देशबांधवांना राष्ट्रीय स्वातंत्र्याची प्रेरणा देताना म्हटले आहे की, "राजकारणाला धर्म आहे आणि धर्माला राजकारण आहे" हे परमेश्वरी सत्य ओळखून, "जर माझ्या प्रिय देशाचे दोन कोटी लोक आता स्वातंत्र्य मिळवायचेच" या निर्धाराने उठले तर त्यांना एक ऑस्ट्रियाच काय, पण असे तीन ऑस्ट्रिया एकत्र आले तरी त्यांचा पराभव करून आपले स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय राहणार नाहीत. स्वातंत्र्यप्राप्ती भीक मागून मिळणार नाही, किंवा केवळ परकीय मालावर बहि:ष्कार घालून मिळणार नाही, तर ते गुप्तसंस्था, सशस्त्र क्रांती, गुप्तकट, गनिमीकावा युध्द या मार्गानेच मिळेल आणि ते फायद्याचे म्हणून मिळवावयाचे नाही तर मर्दाचे कर्तव्य म्हणून मिळविले पाहिजे.

सावरकर पुढे म्हणतात की, मॅझिनीच्या क्रांतीवादी विचाराने प्रेरीत

होऊन इटालियन जनता स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृढ निर्धाराने ऑस्ट्रिया-विरूद्ध लढली आणि इटलीला स्वतंत्र केले. इटली स्वतंत्र झाल्यानंतर तिचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी मॅझिनीने राष्ट्रैक्याचा संदेश इटालियन जनतेला दिला. दास्यमुक्तता, राष्ट्रैक्य, लोकसत्ता व समता या मूलभूत तत्वांचे शिक्षण मॅझिनीने आपल्या तरूण इटलीस दिले. "ज्याने राखेच्या ढिगाऱ्यातून जिवंत राष्ट्र निर्माण केले, त्या इतिहास देवीच्या या ताईताला त्याने जे निशाण उभारले ते परमेश्वरापर्यंत पोहोचणारे निशाण होते." या शब्दात सावरकरांनी मॅझिनीला आदरांजली वाहून, परमेश्वराच्या घरी प्रत्येक देशाकरिता एक एक मॅझिनी ठेवला असेल तर कोणालाच इटलीचा हेवा वाटण्याचे कारण नाही. या शब्दात मॅझिनीचे महत्व विशद केले. कारण ते पुढे लिहितात, की भारतातही असा एक महान द्रष्टा जन्मला होता. सत्पुरूष हे परमेश्वराच्या अंशाने स्पर्शित झालेले असल्याने त्यांचे आत्मे हे भिन्न नसतात. म्हणून त्यांचे विचारही परस्परांशी विसंगत नसतात. निरनिराळ्या देशातील त्यांची नांवे तेवढी वेगळी असतात, परंतु त्यांची तत्वे एकच असतात. म्हणून "इटलीमध्ये जन्मलेल्या रामदासांना मॅझिनी म्हणतात, तर भारतात जन्मलेल्या मॅझिनीला रामदास म्हणतात. सावरकरांच्या मते, ज्याप्रमाणे रामदासांनी स्वातंत्र्यासाठी प्रेरणा दिली त्याच प्रमाणे मॅझिनीने इटलीत स्वातंत्र्यासाठी कार्य केले. मॅझिनीही स्वातंत्र्याचा प्रणेता व तत्ववेत्ता होता. म्हणून सावरकरांनी त्यास आपले गुरू मानले. त्याच्या राजकीय जीवनातून आणि तत्वज्ञानातून प्रेरणा घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. [५]

<u>जोसेफ मॅझिनीचे संक्षिप्त जीवन चरित्र :</u>

इटालियन स्वातंत्र्याचा प्रणेता जोसेफ मॅझिनीचा जन्म २२ जून १८०५ रोजी इटलीतील जेनोआ (पीडमॉंट) येथे झाला. बालवयापासूनच मॅझिनीला

वाचनाचा छंद होता. इ.स. १८२७ मध्ये त्याने जेनोआ विद्यापीठातून कायद्याची पदवी संपादन केली आणि वकीली व्यवसायास सुरुवात केली. या काळातच त्याच्यावर राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव पडला.

ऑस्ट्रियन साम्राज्यशाहीतून इटलीला मुक्त करण्यासाठी १८३० मध्ये मॅझिनी कारबोनारी या संघटनेत सहभागी झाला. राजद्रोही म्हणून त्याला साव्होना तुरुंगात ठेवण्यात आले. परंतु पुराव्याअभावी त्याची सशर्त मुक्तता करण्यात आली. त्यानंतर त्याचे उर्वरित बहुतेक जीवन हद्दपारीत फ्रान्स, स्वित्झर्लंड, इंग्लंड इत्यादी देशांत गेले. तेथूनच त्याने इटलीच्या स्वातंत्र्य लढयास सर्वतोपरी मार्गदर्शन केले. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात लॉंबर्डी, व्हिनेशिया हे प्रदेश ऑस्ट्रियाच्या ताब्यात होते. तसेच पार्मी, तस्कनी वगैरे प्रदेशांवर ऑस्ट्रियन राजघराण्यातील लोकांचेच राज्य होते. फक्त पीडमॉंट हा प्रदेश इटालियन राजघराण्याच्या ताब्यात होता. इटली देश वेगवेगळ्या राज्यांच्या नियंत्रणाखाली आणि राजेशाहीच्या अंमलाखाली असल्याने तेथे फारशी राजकीय जागृती झाली नव्हती. अशा परिस्थितीत मॅझिनीने साव्होनाच्या तुरुंगात असतानाच आपल्या जीवनाचे ध्येय धोरण निश्चित केले, ते म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविणे हे ध्येय व सशस्त्र क्रांती हे त्याचे साधन निश्चित केले आणि देशाबाहेर मार्सेलिस (फ्रान्स) येथे हद्दपारीत राहण्याचे ठरविले.[६]

मार्सेलिसला गेल्यानंतर मॅझिनीने पीडमॉंटच्या चार्ल्स अॅल्बर्ट राजाला १८३१ मध्ये जाहीर पत्राद्वारे अशी विनंती केली की, पीडमॉंटला घटनात्मक शासन द्यावे, आणि इटलीच्या स्वातंत्र्य लढयात पुढाकार घेऊन लॉंबर्डी - व्हीनीशियातील ऑस्ट्रियनांना हाकलून द्यावे. परंतु त्यावर अॅल्बर्टची प्रतिक्रिया मॅझिनीला अटक करावी अशी झाली. दरम्यान मार्सेलिसच्या दोन

वर्षाच्या वास्तव्यात त्याने परकीय सत्तेपासून तसेच अंतर्गत जुलूमांपासून स्वतंत्र व लोकशाही राष्ट्र म्हणून संयुक्त इटलीच्या स्थापनेसाठी सीमेवरील बहुतेक इटालियन लोकांना संघटीत केले. "तरुण इटली" ही गुप्त संघटना स्थापन केली. स्वतंत्रता, समता, मानवता, दास्यमुक्तता, राष्ट्रैक्य ही तत्वे या संघटनेने निश्चित केली. त्यामुळे "तरुण इटली" च्या विविध शाखा जेनोआ व इतर शहरांतून कार्यरत झाल्या. तरुणांवर या संघटनेची तात्काळ छाप पडली. १८३३ मध्ये या संघटनेत सुमारे ६०,००० अनुयायी होते. जनमानसावर "तरुण इटली" चा फार मोठा परिणाम झाला. त्यातूनच पीडमॉंटच्या लष्करात बंड करण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. त्यात मॅझिनीचा सहभाग होता. आणखी असाच प्रयत्न जेनोआ व इतरत्र झाला. परंतु तोही अयशस्वी झाला. मॅझिनीने अनेक लेख लिहून इटालियन जनतेला स्वातंत्र्य मिळेपर्यंत क्रांतीयुध्द करण्याचा संदेश दिला.

मॅझिनीने जर्मनी, पोलंड व इटली देशातील हद्दपारीत असणाऱ्या लोकांचे १८३४ मध्ये एक लढाऊ पथक बनवून इटलीतील परकीय सत्तेवर हल्ला केला. परंतु अंतर्गत कलहामुळे तो हल्ला अयशस्वी झाला. त्यानंतर त्याने "तरुण इटली" च्या धर्तीवर "तरुण युरोप", "तरुण स्वित्झर्लंड", "तरुण जर्मनी", "तरुण पोलंड" अशा गुप्त संघटना संघटीत केल्या. १८३७ मध्ये तो काही इटालियन मित्रांना बरोबर घेऊन लंडनमध्ये राहू लागला. तेथे त्याने इंग्रजी भाषा अवगत करुन ब्रायटन, गटे, कार्लाईल, दाटे इत्यादींच्या साहित्यावर निबंध लिहिले. याच काळात त्याने एक वर्तमानपत्र सुरु करुन त्यातून "मानवी हक्क" हा निबंध क्रमशः प्रसिध्द केला. १८४७ मध्ये त्याने "पीपल्स इंटरनॅशनल लीग" ही संस्था स्थापन केली.

चार्ल्स अॅलबर्टने १८४८ मध्ये ऑस्ट्रियाविरुद्द स्वातंत्र्य युद्द सुरू केले तेव्हा मॅझिनी लंडनमधून इटलीला आला. या स्वातंत्र्यलढयात ग्यारिबाल्डीच्या नेतृत्वाखाली त्याने युद्दात भाग घेतला. [७]

तस्कनीमध्ये स्वराज्याची मुहूर्तमेढ झाली. ग्यारिबाल्डी प्रधान मंत्री झाला. मॅझिनीची त्रिसदस्य समितीत नेमणूक झाली. नंतर रोममध्ये प्रजासत्ताक स्थापन झाल्यावर तेथे त्याची प्रशासक म्हणून नियुक्ती झाली. प्रशासकीय कारकिर्दीत त्याने शेतकऱ्यावरील करभार कमी करण्याचा प्रयत्न केला. तसेच शहरात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. परंतु फ्रेंचानी रोम जिंकून घेताच त्याने पुन्हा लंडनचा आश्रय घेतला. याच काळात त्याने मिलान व मेसीना येथील अयशस्वी बंडात बंडवाल्यांना मार्गदर्शन केले. तसेच इटालियन जनतेला स्वातंत्र्याची प्रेरणा देणारे क्रांती लेख लिहिले, आणि स्वातंत्र्य मिळेपर्यंत पुन्हा - पुन्हा क्रांती युद्द करण्याचे विचार या लेखांत मांडले. १८५७ मध्ये त्याच्या विचाराने प्रेरीत झालेल्या जेनोआ व नेपल्स येथील उठावाना मदत करण्यासाठी तो इटलीत आला. या उठावात त्याचा हात आहे म्हणून सरकारने त्याला फाशीची शिक्षा दिली. तेव्हा तो इंग्लंडला पळून गेला. १८५९ मध्ये फ्रँको-पीडमॉंट यांच्या संयुक्त फौजांनी ऑस्ट्रियाविरुद्द काव्हूरच्या मदतीने युद्द सुरू केले. तेव्हा मॅझिनी इटलीत आला. इटलीच्या संसदेवर त्याची प्रतिनिधी म्हणून निवड झाली. परंतु त्याने राजेशाहीस एकनिष्ठ राहण्याची शपथ घेण्यास नकार दिला. कारण त्याला इटलीत लोकशाही अभिप्रेत होती.

मॅझिनीने उर्वरित आयुष्य निराशेत पण मानवतावादाचा प्रसार व प्रचार कार्यात घालविले. त्याच्या उत्तरायुष्यात इटलीचे एकत्रिकरण होऊन देशाला स्वातंत्र्य मिळाले. परंतु मॅझिनीला अभिप्रेत असलेल्या लोकशाही

ऐवजी तेथे राजेशाही आली म्हणून तो काहीसा निराश झाला होता. १० मार्च १८७२ रोजी मॅझिनीचे निधन झाले. मॅझिनीच्या लोकशाही, राष्ट्रैक्य, सशस्त्र क्रांती, गनिमीकावा इत्यादी राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव भारतातील क्रांतीकारकांवर विशेषत: सावरकर संप्रदायावर पडलेला दिसतो.[८]

## सावरकरांवर पडलेला मॅझिनीचा प्रभाव :

स्वा. सावरकर हे राष्ट्रीय स्वातंत्र्याचे सशस्त्र क्रांतीवादी नेते होते. भारताचे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळविणे हे त्यांचे ध्येय होते. सशस्त्र क्रांती हे त्या ध्येयाचे साधन आहे असे ते मानीत. सशस्त्र क्रांतीच्या मार्गानेच राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळेल. नि:शस्त्र प्रतिकाराच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळ-णार नाही असे त्यांचे ठाम मत होते. म्हणून त्यांनी सुरुवातीपासूनच "मित्रमेळा" आणि "अभिनव भारत" या संस्थाद्वारे भारतीय तरुणांत स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीवादी विचारांचा प्रसार केला. त्यांच्या मते मॅझिनीनेही राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला आणि ह्याच मार्गाने त्याने इटलीचे स्वातंत्र्य मिळविले. अर्थात क्रांतीसाठी त्याने इटलीत प्रथम मनपरिवर्तन केले व नंतर शरीरपरिवर्तन केले. हे सत्य सावरकरांना मॅझिनीच्या चरित्र वाङ्मयात आढळून आले. म्हणून सावरकरांनी मॅझि-नीला आपले राजकीय गुरु मानून "जोसेफ मॅझिनी - आत्मचरित्र व राजकारण" हा क्रांतीवादी विचारांचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ लिहिण्याचा उद्देश म्हणजे मॅझिनीने राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी स्वीकारलेला आणि यशस्वी झालेला क्रांतीचा मार्ग आणि आपण स्वीकारलेला क्रांतीचा मार्ग यातील साम्य भारतातील आपल्या सहकार्यांना दाखवून देणे, इटलीच्या उदाहरणाने त्यांचा क्रांतीच्या मार्गावरील विश्वास दृढ करणे, मॅझिनीचे राष्ट्रीय

स्वातंत्र्याचे क्रांतीचे विचार त्याच्या वाचनात आणणे आणि या विचारांतून प्रेरणा घेऊन त्यांनी इटलीप्रमाणेच स्वातंत्र्यासाठी क्रांती करावी, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात लोकशाही, राष्ट्रैक्य, समता मानुषता यांची प्रस्थापना व्हावी, अशा प्रमुख उद्देशांनी सावरकरांनी या ग्रंथात मॅझिनीच्या मुखातून राष्ट्रवादी विचार मांडले आहेत. त्यांच्या मते इटली आणि भारत यांच्या परतंत्र अवस्थेत बरेच साम्य आहे. अशा परतंत्र स्थितीत मॅझिनीच्या क्रांतीवादी विचारांनी प्रेरीत झालेल्या "तरुण इटली" ने ऑस्ट्रियाविरुद्ध सशस्त्र क्रांती करुन इटलीचे स्वातंत्र्य मिळविले. त्यामुळे मॅझिनीने स्वीकारलेले आणि यशस्वी झालेले सशस्त्र क्रांतीचे विचार भारतीयांच्या वाचनात आले तर "अभिनव भारत" या संस्थेद्वारे, इंग्लंडविरुद्ध सशस्त्र क्रांतीयुद्ध करुन भारताचे स्वातंत्र्य मिळविता येईल असे सावरकरांना वाटू लागले. म्हणून त्यांनी आपल्या सशस्त्र क्रांतीच्या विचारांना मॅझिनीच्या विचारांचा भक्कम आधार देऊन आपले मॅझिनीप्रणीत राष्ट्रवादी विचार या ग्रंथात मांडले. [१]

सावरकर आणि मॅझिनी यांच्या राजकीय स्वातंत्र्याच्या विचारांत साम्य होते. आपल्या राष्ट्रवादी विचारांना मॅझिनीच्या तत्त्वज्ञानाच्या संदर्भात विकसित करण्याचा सावरकरांचा प्रयत्न होता. कारण स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्याने दाखविलेला मार्गच योग्य आहे असे सावरकरांना वाटत होते.

मॅझिनीचे राष्ट्रवादविषयक विचार :

सावरकरांच्या मते मॅझिनीचे अंतिम ध्येय इटलीला स्वतंत्र करुन तेथे लोकसत्ता स्थापन करणे हे होते. त्यासाठी त्याने सशस्त्र क्रांतीचा मार्ग

स्वीकारला. मॅझिनीच्या मते, राष्ट्रीय स्वातंत्र्य भिक्षा मागून अगर नि:शस्त्र प्रतिकाराच्या मार्गाने मिळणार नाही. ऑस्ट्रियाची अन्यायी जुलमी राजवट नष्ट करण्यासाठी लोकांनी लोकांच्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा स्वीकार केला पाहिजे. परंतु यासाठी अगोदर इटलीत ऐक्य घडवून आणले पाहिजे. इटली एक राष्ट्र झालेली, स्वातंत्र्याने मंडीत असलेली, परकीयांचा तिच्यावर अप्रत्यक्षासुध्दा दबाव नसलेली, शक्तीने बलाढ्य व नीतिमत्तेने श्रेष्ठ, अिटली निर्माण करण्यासाठी इटलीच्या प्रयत्नाचे नेतृत्व लोकांनीच स्वीकारले पाहिजे. यासाठी मॅझिनीने "तरुण इटली" या गुप्त संघटनेची स्थापना केली.

सावरकरांच्या मते, मॅझिनीने राष्ट्रवादाची प्रागतिक अशी व्याख्या केली. त्याच्या मते राष्ट्र म्हणजे सर्वांच्या संमतीने एकजीव झालेले आणि एकाच शासन पध्दतीने शासीत असलेले लोक होत. हे लोक एका विशिष्ट प्रादेशिक विभागात राहातात.

## "तरुण इटली" चे स्वरुप :

मॅझिनीने "तरुण इटली" चे तत्वज्ञान मांडीत असताना असे विचार व्यक्त केले की, सर्व जग हे प्रगती आणि उत्क्रांती या नियमाने अनुशासीत झाले आहे. मनुष्य हा महान कार्यासाठी जन्माला आलेला असून त्याच्या जीवनाचे अंतिम ध्येय त्याच्या सर्व शक्तीची पूर्ण स्वतंत्र व व्यवस्थितरित्या वाढ करणे आवश्यक आहे. या मानवी शक्तीच्या पूर्ण विकासासाठी मनुष्याने निष्ठेने आणि सहकार्याने वागले पाहिजे. "तरुण इटली" ही संघटना सर्व विश्व हे एक कुटुंब आहे असे मानले. विश्वकुटुंबाकडे जाण्याचा तो महत्वाचा

विकासाचा मार्ग आहे, तो परस्पर सहकार्याने आक्रमीता येतो. मॅझिनीचे असे मत होते की, विश्व कुटुंबाची रचना करण्यापूर्वी प्रत्येक व्यक्तीने स्वत:चे राष्ट्र नावाच्या घटकाचे संघटन केले पाहिजे. राष्ट्रैक्याशिवाय राष्ट्र निर्माण होत नाही आणि कायम व अखंड असे राष्ट्र दास्यमुक्ततेशिवाय शक्य नाही. स्वातंत्र्याशिवाय दास्यमुक्तता मिळत नाही, आणि लोक-शाही टिकत नाही. म्हणून "तरुण इटली" चा उद्देश इटली देशाचे राष्ट्रैक्य प्रस्थापित करणे, लोकांना व्यक्तीस्वातंत्र्य देणे आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त करणे हा आहे.

मॅझिनीच्या मते, आधुनिक समाजातील उत्क्रांती ही लोकशाही क्रांती असेल. कारण लोक आता व्यक्तीस्वातंत्र्याचा उपमर्द करणाऱ्या जुलमी अनुवंशिक राजेशाहीच्या विरोधात आहेत. क्रांती ही लोकांकडून लोकांसाठीच झाली पाहिजे. लोकसत्ता पध्दतीमध्येच स्वातंत्र्य व समता प्रस्थापित होईल. धार्मिक स्वातंत्र्य मिळेल. विशिष्टाधिकार नष्ट होईल आणि योग्य ते-शिवाय अधिकार मिळणार नाही.

मॅझिनीच्या मते, ज्यांची स्वतंत्रता, समता, मानुषता, दास्यमुक्तता, राष्ट्रैकता यांवर श्रध्दा आहे, त्यांनाच "तरुण इटली" चे सभासद होता येईल. प्रगती व कर्तव्य या दोन तत्वावर विश्वास असणाऱ्या इटालियन जनतेची "तरुण इटली" ही एक सहकारी संस्था आहे. या संस्थेचा आत्मविश्वास असा आहे की, इटली ही एकराष्ट्र होणारच. तिच्या आजपर्यंतच्या प्रयत्नातील अपयशाचे खरे कारण म्हणजे तिच्या क्रांती शक्तीची दिशाभूल हे होय. या संस्थेच्या सभासदांचे मुख्य ध्येय म्हणजे इटलीला स्वतंत्र करुन देशात स्वशासीत सर्व लोकांची एकराष्ट्र सत्ता निर्माण करणे हे होय.

"तरुण इटली"ची मूलतत्वे :

मॅझिनीच्या मते, कोणत्याही संस्थेची सुरक्षितता, उपयुक्तता व विकास हा तिच्या ध्येयनिश्चिततेच्या स्पष्टतेवर अवलंबून असतो. तसेच त्या संस्थेची शक्ती ही तिच्या सभासदांच्या ऐक्यावर अवलंबून असते. प्रत्येक तत्वात त्याच्या साधनांचाही समावेश होतो. त्यामुळे जसे साध्य असेल तशीच साधने असावीत. जोपर्यंत क्रांतीचे ध्येय स्पष्ट नसते तोपर्यंत तिची साधनेही अनिश्चित व अपयशी असतात. दृढ आत्मविश्वासाशिवाय क्रांतीची चळवळ यशस्वी होत नाही, हे इतिहासाने दाखवून दिले आहे.

त्याच्या मते, "तरुण इटली" या मुख्य उद्देश राज्यक्रांती करणे हा आहे. त्यामुळे तिचे प्रयत्न हे क्रांतीपूर्वी व नंतरही शिक्षणात्मक राहतील. ज्या तत्वांच्या शिक्षणाने राष्ट्रीय मन सुसंस्कृत करण्याचा व इटलीचे पुनरुज्जीवन आणि रक्षण होण्याचा संभव आहे अशा तत्वांचा व विचारांचा बोध होण्यासाठी "तरुण इटली" त्यांचे सतत विवेचन करीत राहील. सत्याचा उपदेश करणे हे तिचे कर्तव्य आहे. अशी "तरुण इटली"ची धारणा आहे. क्रांतीला आरंभ करण्यापूर्वी कोणत्यामार्गाने लढले पाहिजे याचा उपदेश करण्यात, इटलीच्या समोर स्वातंत्र्याचे निशाण फडकत ठेवण्यात लोकांना या निशाणाखाली एकत्र येण्याचे आवाहन करण्यात व स्वयंसेवकांचे लढे उभारण्यात ही संस्था आपले कर्तव्य पार पाडील. इटली देश पूर्ण स्वतंत्र होताच तो आपला स्वत:चा स्वतंत्रतेचा ध्वज उभारील, आणि कोणत्या तत्वांनी व नियमांनी राष्ट्राने वागावे यासंबंधी स्वत:ची इच्छा प्रकट करील. ती इच्छा सर्वपूज्य व सर्वमान्य असेल. [१०]

लोकसत्ता तत्व -

मॅझिनीच्या मते "तरुण इटली" ही लोकसत्ताप्रिय आहे. कारण परमेश्वराचीच अशी आज्ञा आहे की, प्रत्येक राष्ट्र हे समान व स्वतंत्र अशा देशबांधवांनी बनलेले असावे. लोकसत्ताक पध्दतीशिवाय स्वदेशाची सुस्थिती सुरक्षित राहील अशी दुसरी कोणातीच राज्यपध्दती नाही. राज्याची सत्ता ही एखाद्या व्यक्तिच्या हाती देऊन तिला सर्वांच्या डोक्यावर चढविले तर अशीच अधिकाराची लालसा इतर वर्गातही पसरत जाते. त्यामुळे लोकांतील समता नष्ट होऊन अखेर स्वदेश स्वातंत्र्य नष्ट होते. एकदा सत्ताधीशत्व राष्ट्रपुरुषातून निघून ते निरनिराळ्या प्रांताकडे गेले की, त्या प्रांतात सत्तेसाठी संघर्ष सुरु होतो. भेद वाढून एकी नष्ट होते. त्यामुळे अविश्वास व द्वेष यांनी राष्ट्राची प्रत्यक्ष जीवनशक्तीच वाया जाते. राजेशाही पध्दतीत राजाचा लोकांशी प्रत्यक्ष संबंध येत नाही. त्यामुळे त्याला लोकांचा पाठींबा नसतो. म्हणून पाठींब्या-साठी त्याला सरदारांचा वर्ग निर्माण करावा लागतो. परंतु सरदारवर्गामुळे देशात विषमता व दुराचार वाढतो. निसर्ग व इतिहास यांचा उपदेशअसा आहे की, राजा निवडण्याची पध्दती आली की बेबंदशाहीला सुरुवात होते. तसेच राजेशाहीची अनुवंशिक पध्दती स्वीकारली तर जुलूमशाहीला सुरुवात होते. परंतु आता राजा हा विष्णूचा अंश आहे. या दुष्ट प्रवृतीचा नाश झाला आहे. त्यामुळे राजाच्या अंगी अधिकार गाजविण्याची व एकी ठेवण्याची शक्ती उरलेली नाही. युरोप खंडात उत्क्रांती होत आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, लोकसत्ता तत्वच सिंहासनारुढ होणार. अशा परिस्थितीत इटलीत राजसत्ता राज्यपध्दती स्वीकारली तर तीत लवकर घडणाऱ्या क्रांतीची बीजे पेरली जातील.

"तरुण इटली" ही लोकसत्ताप्रिय आहे. कारण इटलीमध्ये राजेशाहीची कोणतीच चिन्हे अस्तित्वात नाहीत. राजा व जनता यांच्यामध्ये सरदारांचा वर्ग नाही. संपूर्ण इटलीला राष्ट्रीय स्वरूप देणारा व सर्वांना प्रिय असणारा एकही राजवंश इटलीत नाही. इटलीचा प्राचीन बाणा लोकसत्ताप्रियत्व हाच आहे. इटलीची श्रेष्ठ पूर्वस्मारके लोकसत्तावादी आहेत. तिच्या राष्ट्रीय उत्क्रांतीचा सर्व इतिहास लोकसत्ताप्रिय आहे. इटलीतील लोक हे एका व्यक्तीला राज्य मिळावे म्हणून कधीही लढणार नाहीत. परंतु लोकसत्तेचे महान तत्व त्यांच्या समोर ठेवले तर त्यांच्या प्राप्तीसाठी सर्व इटालियन आनंदाने एकत्र येतील. त्यामुळे राष्ट्राने क्रांती करण्याचा उपाय म्हणजे लोकसत्ता हा होय. लोकसत्तेत लोकांचे प्रत्यक्षरीतीने कल्याण होईल व त्यांना त्यांचे जन्मसिध्द हक्क परत मिळतील. म्हणून लोकसत्ता हीच त्यांची आशा असली पाहिजे. सध्या देशातील सर्व संस्थानांची स्थिती ही खेळांतील बाहुल्यांप्रमाणे बनली आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या पवित्र कार्यात त्यांचा काही उपयोग होणार नाही. म्हणून रणांगणात उतरुन आपण लोकांना हाक मारली पाहिजे. स्वतंत्रता व लोकसत्ता या तत्वांचा उच्चार करुन लोकांनाच क्रांतीसाठी प्रोत्साहीत केले पाहिले. या सर्व कारणांमुळे "तरुण इटली" ही लोकसत्तावादी संस्था आहे. इटलीला स्वतंत्र करुन देशात लोकसत्ताक शासन पध्दती निर्माण करणे हा तिचा अंतिम हेतू आहे. [११]

राष्ट्रैक्याचे तत्व :

मॅझिनीच्या मते, "तरुण इटली" चे दुसरे तत्व म्हणजे राष्ट्रैक्य हे होय. "तरुण इटली" ही राष्ट्रैक्यवादी आहे. कारण ऐक्यशिवाय खरे राष्ट्रच निर्माण होऊ शकत नाही. खरी शक्तीमत्ता येत नाही. इटली

देश पुन्हा मध्ययुगातील अंतर्गत यादवीत जाऊन पडेल. देशाचे स्थानिक व प्रांतिक अभिमानामुळे लहान-लहान तुकडे पडतील. त्यामुळे मत्सर वाढून पुन्हा राजे लोकांच्या जुलमाला सुरुवात होईल. त्याच्या मते युरोप खंडाच्या प्रगत अवस्थेत विस्तृत व एकात्म व केंद्रीभूत व्हावा. युरोपच्या चळवळीत एक राष्ट्र या नात्याने इटलीने वागावे या सर्व कारणामुळे "तरुण इटली" ही राष्ट्रैक्यवादी आहे. [१२]

सावरकरांच्या मते, मॅझिनीने वरीलप्रमाणे "तरुण इटली" ची मूल-तत्वे स्पष्ट करुन म्हटले आहे की, ही मुलतत्वे म्हणाजे "तरुण इटली"चे धर्म-मत आहे. ज्यांची या राष्ट्रीय धर्मावर श्रध्दा आहे व जे स्वीकारावयास तयार आहेत त्यांनाच "तरुण इटली"त घेतले जाईल. ही संस्था तत्वांच्या स्पष्टीकरणासाठी व प्रसारासाठी वेळोवेळी लेख प्रसिध्द करील. ही सर्व तत्वे दीक्षा देणा-याकडून दीक्षा घेणा-यांना शिकविली जातील. दीक्षा-धिकारी व दीक्षीत वर्ग यांनी या तत्वाप्रमाणे आपले नैतिक आचरण ठेवावे. तत्व आणि कृती यांत मेळ असत नाही, तेव्हा ती तत्वे प्रसारीत व्हावीत म्हणून केला जाणारा प्रयत्न हे केवळ ढोंग असते. केवळ नैतिक आचरणानेच "तरुण इटली" ला इतरांना आपल्या मताकडे वळविता येईल. म्हणून इटलीच्या राष्ट्रधर्माची मुहुर्तमेढ रोवणे हे आपले प्रमुख कर्तव्य आहे.

स्वातंत्र्याची साधने :

मॅझिनीच्या मते, राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्तीची साधने दोन आहेत. ती म्हणजे १) शिक्षण व २) उठावणी ही होत. या साधनांचा उपयोग ज्या त्या वेळीच केला जाईल.

राष्ट्रीय स्वातंत्र्याचे शिक्षण हे उदाहरणाने, भाषणाने व लेखणीने दिले जाईल. त्याचा उद्देश उठावणीचे महत्व व आवश्यकता लोकांच्या मनात बिंबवणे हा राहील. उठावणी ही अशा रीतीने केली जावी की तिच्या योगाने राष्ट्राला उच्च प्रकारचे शिक्षण मिळावे. स्वातंत्र्य-युध्दाचे व स्वातंत्र्य प्राप्तीचे शिक्षण इटलीत गुप्त पध्दतीने दिले जाईल व इतर देशांत उघड रीतीने दिले जाईल. जे राष्ट्रभक्त हद्दपार झालेले आहेत त्यांनी राष्ट्रधर्म प्रवर्तन समिती स्थापन करावी. उठावाच्या आरंभाची सर्व तयारी गुप्तपणे करावी. त्याचे शिक्षण व माहिती इटलीत व इटली-बाहेर अत्यंत गुप्तपणे यावी. "तरुण इटली"ची तयारी होताच योग्य संधी साधून उठावणीस आरंभ करावा. उठावणीचे स्वरूप नेहमी राष्ट्रीय असावे. तिच्या कार्यक्रमात राष्ट्रैक्याची बीजे पेरावी. एखाद्या प्रांतात उठावास प्रारंभ झाला तर त्यास राष्ट्रव्यापी स्वरूप देण्यात यावे. उभारलेली क्रांती ही अशा रीतीने सुरु ठेवावी की, स्वदेश हित हेच आपले हित अशी भावना सर्व लोकांची राहील. त्यामुळे लोकांची खात्री अशी होईल की, आम्ही आमचे राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्यास समर्थ आहोत. एकराष्ट्र निर्माण करण्यासाठी लोकांत राष्ट्रनिष्ठा उत्पन्न केली पाहिजे. ती परकीय मदतीने होणार नाही. तरीपण "तरुण इटली" ही परकीय मदतीचा शक्य तितका फायदा घेईल. परंतु उठावणीची वेळ व तिचे स्वरूप स्वत:च ठरवील.

मॅझिनीच्या मते, क्रांतीप्रिय युरोप हा उठावाचे निशाण फडकण्याचीच वाट पाहत आहे, मग ते निशाण इटलीनेच का फडकवू नये ? तो आरंभ इटलीनेच का करु नये ? परदास्याचा नाश करण्यासाठी "तरुण इटली" ने जो प्रयोग करण्याचा ठरविला आहे तो अजून कोणीच केलेला नाही. त्यामुळे यांत इटलीचा विजय निश्चित आहे. विजयाचा आत्मविश्वास आला

आहे. आत्मविश्वासाने युक्त असलेले व आता स्वातंत्र्य पाहिजेच अशी प्रतिज्ञा घेतलेले इटलीचे दोन कोटी लोक दंड ठोकून उभे राहतील. तेव्हा त्यांना काय करणे अशक्य आहे ? आत्मविश्वास व स्वातंत्र्यप्रेम उत्पन्न करण्यासाठी प्रथम मनपरिवर्तन व नंतर उठावणी केली जाईल. "तरुण इटली" ला असे वाटते की, उठावणी व क्रांती यामध्ये अंतर असते. तेव्हा या काळात एका तात्पुरत्या व थोडया लोकांच्या हातात केंद्रीभूत झालेल्या सत्तेचा अंमल चालेल. नंतर इटली पूर्ण स्वतंत्र होताच प्रत्येक अधिकार राष्ट्रीय समितीच्या हाती दिला जाईल आणि सर्वजण तिच्या आज्ञा पाळतील.

## क्रांतीसाठी मनपरिवर्तनाचे शिक्षण :

सावरकरांच्या मते, मॅझिनीचे अंतिम ध्येय ऑस्ट्रियाच्या गुलामगिरीतून इटलीची मुक्तता करणे हे होते. त्यासाठी त्याने सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला होता. परंतु ही सशस्त्र क्रांती याविषयी मनपरिवर्तन झाले पाहिजे म्हणून त्याने "तरुण इटली" च्या शाखा गुप्त स्वरूपात इटलीत काढल्या आणि या शाखाद्वारे इटालियन लोकांना राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी क्रांतीप्रवणाचे शिक्षण दिले. मॅझिनीच्या मते, मोठमोठया राजकीय क्रांत्या ह्या तत्वांनीच घडवून आणलेल्या असतात. त्या क्रांत्या प्रथम मनात होतात व नंतर त्या व्यवहारात होतात. जेव्हा स्वतंत्रतेच्या पवित्र हक्कासाठी तलवारीचा उपयोग केला जातो तेव्हाच त्या तलवारीला विजय मिळतो. परंतु हे हक्क कोणाचे आहेत हे प्रथम लोकांना समजले पाहिजे. संपूर्ण समाजाला उत्तम आत्मशिक्षण दिले असता त्यास हक्क व कर्तव्ये समजू लागतात. जेव्हा स्वातंत्र्यप्रेम, पारतंत्र्याचा तिरस्कार, शत्रूची कपटनीती आणि त्या शत्रुच्या नाशाचे मार्ग या संबंधीच्या तत्वांचे शिक्षण लोकांना मिळते तेव्हा त्यांच्याकडून यशस्वी क्रांती घडून येते. [१३]

## स्वतंत्रतेच्या कर्तव्याचे शिक्षण :

सावरकरांच्या मते, मॅझिनीचे राजकारण हे नीतीच्या पायावर उभे होते. लोकांत स्वराष्ट्र आत्मनिष्ठा निर्माण करण्यासाठी मॅझिनीने "तरूण इटली"ला स्वतंत्रतेच्या कर्तव्याचे शिक्षण दिले. मॅझिनी स्वतंत्रतेच्या कर्तव्याबाबत कर्तव्ये या निबंधात लिहितो की, "इटलीतील माझ्या तरूण देशबंधूनों, ज्या इटलीने जगाचे दोन वेळा नेतृत्व केले त्या आपल्या प्रिय इटलीला परकीयांनी गुलामांचा बाजार बनविले आहे. तिचे स्वामित्व ऑस्ट्रियाकडे गेलेले आहे. पंच्याहत्तर हजार ऑस्ट्रियन शिपाई इटलीवर राज्य करीत आहेत. त्यामुळे इटलीत पारतंत्र्याचे दु:ख, दारिद्र्य, अज्ञान इत्यादी भयंकर परिणाम पडून आले आहेत. पूर्वीच्या व्हेनिस व मिलन या प्रगत भागातील लोकांना सध्या खावयाला अन्न मिळत नाही. देशातील शिक्षण, व्यापार, जीवन, स्वातंत्र्य परकीयांच्या हाती गेले आहे. त्यामुळे इटली ही गुलामांचा तुरुंग बनली आहे. अशा या गुलामगिरीच्या तुरुंगातून आपल्या प्रिय इटलीला मुक्त करण्यासाठी आणि इटलीचे गेलेले वैभव पुन्हा प्राप्त करण्यासाठी राजकीय स्वतंत्रतेचे कर्तव्य पार पाडले पाहिजे. आपल्यापुढे जे कार्य आहे ते लहानसहान नाही. आपण देवाने जे कार्य केले आहे तेच कार्य करीत आहोत. आपण लोकनिर्मिती करीत आहोत. आपण स्वराष्ट्र उत्पन्न करीत आहोत. परमेश्वराने अगदी स्पष्ट अशा शब्दात सांगितले आहे की, इटली हा एक स्वतंत्र देश आहे. समुद्राच्या व पर्वताच्या सीमा आपल्या दिव्य अंगुलीने आखून देवाने इटली देश टालियनांस दिलेला आहे. तेंव्हा इटालियन लोकांचे पहिले कर्तव्य म्हणजे ह्या ईश्वरी आज्ञेप्रमाणे इटली देश स्वतंत्र करणे होय. "तरूण बंधू हा, स्वदेश हे परमेश्वराने आपणास दिलेले घर आहे. या घरात राहून त्याच्या आश्रयाखाली तुम्ही वाढावे व

वाढत वाढत अखेर मानवजातीसह अंतिम स्वरूपाला जावे,अशी त्यांची इच्छा आहे. हे निसर्गनिर्मित घर इटालियनांना वाढण्याकरिता आश्रयम म्हणून दिलेले असून परकीयांनी एक तुरूंग बनवून ठेवला आहे. म्हणून इटलीच्या पुत्राचे पहिले कर्तव्य म्हणजे स्वदेश स्वतंत्र करणे हे होय. प्रथम स्वातंत्र्य मिळविले पाहिजे, देश दास्यमुक्त झाला पाहिजे. इतर सर्व प्रश्न मागाहून सुटतील. चला, ऑस्ट्रियाशी युध्द करा. "आपणास गुलामगिरीचे अनेक हक्क नको असून एकच हक्क पाहिजे आहे व तो म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य, दास्य-मुक्ती हा होय." तो पुढे लिहितो, इटलीमध्ये भाकर स्वस्त आहे किंवा महाग आहे हा मुख्य प्रश्न नाही. त्या भाकरीवर गुलामगिरीचा शिक्का आहे की नाही हा मुख्य प्रश्न आहे. तेव्हा आपल्या प्रिय इटली देशाला स्वतंत्र करणे हे आपले सर्वांचे प्रमुख कर्तव्य आहे.

मॅझिनी व्यक्तीच्या कर्तव्याबाबत पुढे लिहितो की, जे कर्तव्य म्हणून ठरत असेल ते व्यक्तीने वाटेल ते संकट आले तरी पार पाडलेच पाहिजे. कर्त-व्यासाठी कर्तव्य करा. कर्तव्याच्या तत्वाने आत्मविश्वास वाढतो. ह्या उदात्त तत्वाने आत्मा परमेश्वराच्या स्मात लीन होतो. व्यक्तीच्या अंगी विलक्षण चैतन्य येते. त्यामुळे व्यक्ती अफाट कर्म करु शकतो. या कर्तव्या-च्या फलविरहीत निष्ठेने देशवीरांच्या फाशीचे खांब हे स्वर्गाकडे नेणारे जिने होतात. म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपले आयुष्य चैनीत, विलासात न घालविता कर्तव्य कर्मात घालावे. "आयुष्य हे चैन नसून ते कर्तव्य आहे. राजकारणातील पायाभूत कर्तव्य म्हणजे स्वदेश स्वातंत्र्य मिळविणे हे होय. मनुष्यता, स्वदेश, कुटुंब, व्यक्ती अशा क्रमाने व्यक्तीची कर्तव्यतारम्यता आहे. या परंपरेच्या वाट्याला जी राजकीय कर्तव्ये आली आहेत, त्यामध्ये स्वदेश स्वातंत्र्य हे प्रधान कर्तव्य होय. सर्व कर्तव्ये व्यक्तीकडून पार पाडण्यासाठी अगोदर स्वदेश स्वातंत्र्य मिळविले पाहिजे. व्यक्तींची किंवा कुटुंबाची कर्तव्ये

जर त्यांच्या स्वदेश पारतंत्र्यात असतील तर ती कधीही व्यवस्थित पार पाडली जाणार नाहीत. अशा पारतंत्र्य स्थितीत लोकांत असत्य व दारिद्र्य वाढून तो देश भ्याड व दुर्बल बनतो. ज्या देशाला ज्ञान देणे शक्य नसते, तेथे केवळ शाळा उघडून काय उपयोग होणार ? राजकीय पारतंत्र्याने देशातील व्यक्ती, कुटुंब, तसेच काही मानवजातीच्या विकासाची वाट थांबते. प्रत्येक देशावर मानवी कल्याणात भर घालण्याची जबाबदारी असते. परंतु पारतंत्र्यामुळे तो देशच अस्तित्वात नसल्याने तो ही जबाबदारी पार पाडू शकत नाही. सर्व देशाची प्रगती म्हणजे मनुष्याची प्रगती होय. परंतु जोपर्यंत देश पारतंत्र्यात असतो तोपर्यंत मानवी प्रगती होणार नाही. म्हणून व्यक्तीच्या, समाजाच्या व मानवजातीच्या प्रगतीसाठी देशाचे राजकीय स्वातंत्र्य मिळविणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य होय. ही परमेश्वराची आज्ञा आहे. [१५]

सावरकरांच्या मते इटालियन लोकांना क्रांतीच्या प्रमुख तत्वांची माहिती व शिक्षण देण्यासाठी मॅझिनीने "तरुण इटली" प्रसिध्द पत्रक काढले. मॅझिनी या पत्रकात लिहितो की, त्या परकीय जुलमी ऑस्ट्रियन राजवटीचा नाश करण्याचा पूर्ण संकल्प सर्वत्र झाला पाहिजे. हे तत्व सर्वमान्य झाले की, इटली देश स्वतंत्र होईल. परंतु स्थानिक कार्य व महत्व असलेल्या जुन्या लोकांच्या मते, राजकीय हक्क हे कायदेशीर मार्गाने थोडे थोडे मिळविले पाहिजेत. त्यामुळे या लोकांना आपली तत्वे मान्य आहेत, परंतु त्यापासून होणारे परिणाम मात्र नको आहेत. जुलमाचा व पारतंत्र्याचा अतिरेक ते दु:खाने मान्य करतात. परंतु त्याविरुध्द कृती करण्यास ते पुढे येत नाहीत. ज्या कायदेशीर मार्गाने परकीयांनी आपल्याला परतंत्र केले त्याच मार्गाने ते मुक्त होऊ पाहत आहेत. त्यांची गुलामगिरीलाच अनुकूल मते आहेत, कारण त्यांचा गुलामगिरीतच जन्म आणि शिक्षण झालेले आहे. त्यामुळे

आपल्या हक्कासाठी, पूर्व वैभवासाठी, आपल्या अस्तित्वासाठी दंड ठोकून उभा राहणाऱ्या लोकांवर त्यांचा विश्वास नाही. शक्तीचा जोर कसा असतो हे त्यांना माहित नाही. त्यांची सर्व नजर कायदेशीर मार्गावर आहे. परंतु या मार्गाने आपल्याला हजारो वेळा फसविले आहे. हे त्यांच्या अजून लक्षात आले नाही. सर्व इटलीला एका तत्वासाठी व एका उद्देशासाठी एकत्र करण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. स्वातंत्र्यासाठी संपूर्ण इटलीच्या नावाने युध्द केले नाही, लोकांना मोक्षप्राप्तीचे शिक्षण दिले नाही. उलट हे जुने लोक हिंमतीच्या प्रयत्नाला भिऊन बाजूला जाऊन दडून बसले. कारण त्यांना स्वातंत्र्याचा क्रांतीचा मार्ग बेकायदेशीर वाटला होता. त्यांनी राष्ट्रसभा व प्रधान मंडळ या नेभळट संस्थाकडे बोट दाखवून लोकांना फसविले. जो काळ परिवर्तनास किंवा स्वातंत्र्ययुध्दासाठी खर्च करावयाचा तो त्यांनी कायद्याच्या घासाघासीत वाया घालविला.

मॅझिनी पुढे लिहितो की, ते जुने लोक बिचारे सुखी असोत. कारण त्यांच्याकडून ज्या चुका घडल्या त्या त्यांच्या भित्रेपणामुळे घडल्या आहेत. शिवाय क्रांतीच्या स्थितीत घडलेली प्रत्येक चूक ही अंतिम यशाची एकेक पायरीच बनते. त्यांच्या चुकांचा फायदा तरुण पिढीला मिळेल. त्यामुळे अशा चुका तरुण लोक करणार नाहीत. कारण परमेश्वर व विजयश्री ही वीर पुरुषालाच वश असतात. कायदेशीर कार्यपध्दतीत विजयदेवी राहत नसून ती तलवारीच्या अग्रभागी राहत असते. याबाबत इटलीची खात्री झाली आहे. "तरुण इटली" हे त्याचेच फळ आहे. "तरुण इटलीला" माहित आहे की, सशस्त्र क्रांतीशिवाय राष्ट्रीय स्वातंत्र्यप्राप्ती नाही आणि लोकाशिवाय सशस्त्र क्रांती नाही. राजकीय शिक्षणाशिवाय लोक सशस्त्र क्रांतीस प्रवृत्त होणार नाहीत. या नवीन कार्यासाठी जुन्या लोकांचा उपयोग नाही. नवीन परिस्थितीत नवीन माणसे निर्माण व्हावी लागतात. नवीन तरुण लोक

हे जुन्या विचारांनी किंवा संवयींनी दूषित झालेले नाहीत. तसेच त्यांची मने स्वार्थाच्या व लोभाच्या स्पर्शाने भ्रष्ट झालेली नाहीत. त्यामुळे तरुण जिवंत झरे आहेत. अशा तरुणांचासमावेश असलेल्या "तरुण इटली" ला ह्या गोष्टी समजल्या आहेत. त्यामुळे "तरुण इटली" ही आपल्या कर्तव्यांची सांगता करणारच. कारण तिने स्वातंत्र्ययुध्दाची शपथ घेतली आहे.

राजकीय क्रांतीसाठी इटालियन लोकांत मनपरिवर्तन व्हावे यासाठी मॅझिनीने वरीलप्रमाणे क्रांतीवादी विचार मांडले. म्हणून सावरकर म्हणतात, की, मॅझिनीच्या लेखांचा परिणाम कसा झाला हे सांगावयास पाहिजे असे नाही जे शब्द इतका काळ गेल्यानंतरही अजून स्फूर्तीचे जिवंत झरे वाटत आहेत व ज्यांना एकतांच जुलूमाला व पारतंत्र्याला अजून कंप सुटत आहे, ते शब्द ज्या वेळेस त्या स्वातंत्र्यवीराच्या लेखणीतून प्रथम बाहेर पडले तेव्हा त्यांचा परिणाम काय झाला असेल हे कल्पनेनेच जाणले पाहिजे. "मॅझिनीच्या लेखणीने मुकुट उलथे पाडले, सिंहासने पालथी घातली, बादशाहीचे तुकडे उडविले, इटलीच्या समशेरीला स्वातंत्र्याचे पाणी दिले, मोठाल्या राज्यक्रांत्या ह्या तलवारीपेक्षा तत्वानीच घडवून आणलेल्या असतात. त्या क्रांत्या अगोदर मनांमध्ये होतात व नंतर व्यवहारात घेतात हे सिध्द करुन दाखवले. मॅझिनीच्या लेखणीने राष्ट्रीय मोक्षप्राप्तीसाठी चतुर्वेद निर्माण केले. [१६]

स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग :

इटलीच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गाबाबत मॅझिनी लिहितो की, व्यक्तिचा काळ आता संपला आहे. समाजाचा काळ आता आला आहे. म्हणून क्रांतीशास्त्राचे मुख्य तत्व म्हणजे "क्रांती ही जानपदाकडून जानपदासाठीच

केली गेली पाहिजे. हे आमच्या मताचे सार आहेत. ईश्वर व जानपद हाच आमचा भावी कार्यक्रम आहे. म्हणून आम्ही लोकांना सांगणार, "जोपर्यंत राजकीय पारतंत्र्य आहे, तोपर्यंत समाज कोणत्याही क्षेत्रात प्रगती करु शकणार नाही, मात्र स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समाजाची सर्व क्षेत्रात आपोआपच प्रगती होईल, हे सिध्द करुन दाखविणार आहोत. नंतर लोकांना आपल्या पूर्ववैभवाची आठवण करुन देऊ. देशावीरांनी स्वातंत्र्यासाठी आपले देह धारातीर्थी कसे ठेवले ते त्यांना सांगू. ती धारातीर्थी त्यांना दाखवू, आणि या लोकांना उपदेशून सांगू की, "देशबंधुनो", अशी कृत्ये करणे व दंड ठोकून उभा राहणे हे तुमच्या हाती आहे. भीमबळाने उठा, परमेश्वर तुमच्या पक्षात आहे. जुलमाने गांजलेल्यांचा तो सांभाळ करतो, म्हणून मेल्यासारखे झोपताय काय, जागे व्हा, सिंहासारखे उठा."

सावरकरांच्या मते, मॅझिनीने जनतेवर विश्वास ठेवून जनतेच्या सहकार्याने क्रांतीचा पुरस्कार केला. त्याच्या मते, राष्ट्रीय स्वातंत्र्याचे कार्य हे ईश्वरी कार्य आहे आणि त्याचा उद्देश विश्वप्रेम आणि सार्वत्रिक बंधुभाव हा आहे. मॅझिनी विशेषाधिकाराच्या विरोधी होता. तो लिहितो की, "आम्ही विशिष्टाधिकाराचा नाश करु. सर्व राष्ट्रात समतेचे बीज पेरु, सर्व राष्ट्रएक करु, आम्ही परकीयांच्या आशेवर व वचनावर विश्वास ठेवणार नाही. कारण आम्ही हे जाणून आहोत की, लोकसत्तेचा झेंडा उभारला की, राजाची कंबर खचलीच, आमची पक्की खात्री आहे की, तलवारीनेच राजकीय क्रांत्या सिध्दीस जातात. आम्ही लोकपक्षाचे आहोत, आम्ही लोकांशी बोलू, लोक आमचे ऐकतील. लोकांच्या मतास योग्य वळण देऊन आम्ही शक्य तितका प्रयत्न करुन लढाईस प्रारंभ करु, लढाई-लोकपक्षाने चालविलेली, संराष्ट्रीय व गनिमीकाव्याची. ही गनिमीकाव्याची

लढाई जर निश्चयाने व सर्वत्र सुरू केली तर तिच्याशी टिकाव धरण्यास कोणीही समर्थ होणार नाही." १७

सशस्त्र क्रांतीसंबंधी विचार :

सावरकरांच्या मते, मॅझिनीने इटलीच्या राजकीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा स्वीकार केला. त्याच्या मते, ऑस्ट्रियाशी युध्द केल्याशिवाय इटली स्वतंत्र होणार नाही. युध्द करणे हे पाप नाही. जेव्हा एखाद्या सत्याचा जयजयकार करावयाचा असतो किंवा एखाद्या असत्याचा विनाश करावयाचा असतो तेव्हा युध्द करणे हे पवित्र कार्य आहे. इटलीचे स्वातंत्र्य मिळविणे हे सत्य असून त्यासाठी युध्द करणे हे पवित्र कर्तव्य आहे.

सर जेम्स ग्रॅहॅम यांना लिहिलेल्या पत्रात मॅझिनी असे मत मांडतो की, ऑस्ट्रियाच्या जुलमी राजवटीविरूध्द स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणे हे सर्व इटलीयन लोकांचे कर्तव्य आहे. येशुख्रिस्ताने सुध्दा अन्यायाविरूध्द संघर्ष केला होता. तसेच तुम्ही सुध्दा स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांती केली होती. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीमध्ये इटलीला स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीशिवाय दुसरा पर्याय नाही. म्हणून शांततेच्या मार्गाने जर कोणी इटलीस जावयास सांगत असेल तर ते आता अशक्य आहे. कारण साखळदंडाने बांधलेल्या माणसाला मुक्ततेसाठी प्रथम साखळदंडाचे तुकडे उडविलेच पाहिजेत. इटलीमध्ये इंग्लंडसारखे सभा स्वातंत्र्य नाही, स्वतंत्र पार्लमेंट नाही, मुद्रण स्वातंत्र्य नाही, भाषण वा सभा स्वातंत्र्य नाही, त्यामुळे आपल्या मनातील विचार व्यक्त करावयाला मार्ग नाही. म्हणून इटलीच्या स्वातंत्र्यासाठी गुप्त संघटना आणि सशस्त्र क्रांतीशिवाय आम्हाला दुसरा पर्याय नाही. इटलीला तलवारीच्या जोरावर गुलामगिरीत ठेवण्यात आलेले आहे आणि म्हणून

तलवारीच्या बळावरच इटलीला स्वतंत्र व्हावे लागणार आहे. त्यासाठी गुप्तमंडळे स्थापन करणे आवश्यक आहे. [१८]

स्वातंत्र्ययुद्द व गनिमीकावा :

सावरकरांच्या मते, ऑस्ट्रियाशी युद्द केल्याशिवाय इटलीला स्वातंत्र्य मिळणार नाही. अशी मॅझिनीची खात्री झाली होती. त्याच्या मते युद्दाशिवाय इटलीला स्वातंत्र्य मिळणार नाही, अशा वेळी युद्द करणे हे पाप नाही. जेव्हा एखाद्या सत्याचा जयजयकार करावयाचा असतो किंवा एखाद्या असत्याचा विनाश करावयाचा असतो तेव्हा युद्द करणे हे पवित्र कार्य आहे. हे ओळखून त्याने इटलीच्या स्वातंत्र्यासाठी गनिमीकावा युद्द पद्दतीचा स्वीकार केला. या युद्द पद्दतीबाबत मॅझिनी लिहितो, "इटलीचे स्वातंत्र्ययुद्द हे गनिमीकावा पद्दतीने केले जाईल. ज्यांना प्रबळ परकीय सत्तेचा पराभव करून स्वदेशाला स्वतंत्र करावयाचे आहे त्यांनी गनिमीकावा युद्दपद्दतीच स्वीकारली पाहिजे. युद्दाच्या प्रारंभी परकीय सत्तेचा डोळा चुकवून शिस्तवार सैन्याची निर्मिती करणे शक्य नसते. तेव्हा ही उणीव गनिमीकावा पद्दतीने भरून काढता येते. गनिमीयुद्दात लहान लहान टोळ्यांचीच गरज असल्याने त्या ताबडतोब तयार करता येतात. अशा टोळ्या ठिकठिकाणी पसरल्याने शत्रूस मोठे सैन्य रणांगणावर आणावे लागते. त्या सैन्याला सतावून सोडण्यात या लहान लहान टोळ्या समर्थ ठरतात. पारतंत्र्यात लोकांना सैनिकी शिक्षण देणे शक्य नसते. परंतु गनिमी पद्दतीत लोकांना स्वानुभावाने आपोआपच सैनिकी शिक्षण मिळते. त्यामुळे संपूर्ण राष्ट्र युद्दक्षम बनते. उठावाचे यश हे त्याच्या प्रसारावर अवलंबून असते, अशा वेळी या लहान लहान टोळ्या सर्वत्र ठेवणे शक्य असल्याने उठावाचा प्रसार ताबडतोब करता येतो. या युद्दपद्दतीत मोठे सैन्य

जमवावे लागत नसल्याने प्रत्येकाला आपला पराक्रम दाखविण्यास संधी मिळते, शिवाय संधी मिळताच लवकर एकत्र घेता येते. हा सुटसुटीतपणा शत्रूच्या ठिकाणी नसतो, तसेच शत्रूला माहित नसलेल्या या युद्धपद्धतीने घाबरवून सोडता येते. एखाद्या वेळी पराभव झाला तर फारतर एखादी टोळी बुडेल, परंतु बाकीच्या सर्व टोळ्या सुरक्षित राहतील. त्यामुळे कितीही पराभव झाले तरी गनिमीकाव्याने लढत असता निर्मुलन होण्याची भीती नसते. पराभव होत आहे असे वाटताच पळून जाता येते. सर्व टोळ्या राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशाने लढत असल्याने त्यांच्यात बेबंदशाही होत नाही. या युद्ध पद्धतीत टोळ्या एकत्र राहात नसल्याने त्यांच्यापैकी एखाद्या टोळीची माहिती शत्रूला मिळाली तरी इतरांचे बेत सुरक्षित राहतात. या युद्धपद्धतीने राष्ट्रीय युद्धाचे विश्वासघातकापासून संरक्षण करता येते. युद्धाचा पायान नसतो, त्यामुळे एक ठिकाणी गेले तर दुसरे जिंकता येते. तसेच युद्धाचा पाया एकाच ठिकाणी ठेवल्याने जो अनर्थ घडण्याचा संभव असतो तो टाळता येतो. म्हणून स्वातंत्र्य मिळविण्याचा योग्य मार्ग गनिमीकावा युद्ध पद्धती होय. गनिमीकावा हा अजिंक्य आहे, तो अविनाशी आहे. म्हणून स्वातंत्र्ययुद्धाचा आरंभ गनिमीकावा युद्ध पद्धतीने करावा."

या गनिमीकावा युद्ध पद्धतीविषयी सावरकर लिहितात की, "इटलीच्या रामदासाचे हे गनिमीयुद्ध पद्धतीचे स्तोत्र वाचत असता, त्याचे मनन व पठण करीत असता कोणाला महाराष्ट्राच्या मँझिनीची आठवण होणार नाही." १ समर्थांच्या उपदेशात गनिमी युद्धावर भर ठेवलेला होता. छ. शिवाजी महाराजांपासून ते स्वातंत्र्यप्राप्तीच्या राजाराम महाराजांच्यापर्यंत मराठेवीरांनी ह्याच गनिमीकावा युद्ध पद्धतीचा स्वीकार केला होता. या इटलीच्या थोर पुरुषासारखे भविष्यवादी महात्मे, आपल्यांतही निर्माण

झाले होते. याबद्दल आपण अभिमान बाळगावा. परंतु त्या महात्म्यांचा उपदेश इटलीप्रमाणे सार्थ न करता भारत पुन्हा जसा होता तसाच मृत झालेला आहे. याबद्दल शरम वाटावी, हे काही कळत नाही. तेव्हा ही शरम केव्हा जाईल ? याचा आशय असा की भारतीयांनी या विचारांतून प्रेरणा घेऊन राष्ट्रीय स्वातंत्र्याची गनिमीकावा पध्दतीने युध्द करावे." [१९]

## धर्म आणि राजकारण :

इटलीच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढयाची आणि गनिमीकावा युध्दाची आवश्यकता मॅझिनीला पटली होती. परंतु ही सशस्त्र क्रांतीही नैतिक आदर्शांवर आधारलेली होती. म्हणून धर्म आणि राजकारण यातील जवळचे संबंध मॅझिनीने आपल्या लिखाणामध्ये स्पष्ट केले. मॅझिनी धर्माचा स्वत:च्या स्वार्थासाठी वापर करणाऱ्या धर्मगुरूंच्या विरोधात होता. परंतु राजकारणाला उच्च नैतिक अधिष्ठान देण्यासाठी त्याने राजकारण हा एक धर्म मानला.

सावरकरांच्या मते, मॅझिनीचे राजकारण हे केवळ ऐहिक व स्वार्थ-प्रवृतीचे नव्हते. तसे असते तर त्या राजकारणाने प्रवृत झालेल्या इटलीच्या देशवीरांच्या अंत:करणात इतक्या उदात्त प्रवृत्तींचा उदय झाला नसतो. त्यामुळे मॅझिनीचे राजकारण हे प्रवृत्ती व निवृत्ती ह्यांचे एकीकरण होते. त्यांच्या राजकारणाची इमारत ही नीतीच्या पायावर उभारलेली होती. हे सिध्द केल्याने त्या वेळपर्यंत राजकारणाची थोर थोर पुरूषांकडून जी अवहेलना होत असे ती नष्ट झाली. राजकारण हे स्वार्थाचे व अप्पलपोटे-पणाचे शास्त्र आहे व यांत जो बळी तो कानपिळी या पशुवृत्तीचाच अंमल आहे अशी सर्वत्र समजूत असल्याने या राजकारणाचा साधुपुरूषांना तिटकारा

येणे साहजिक होते. दुस-याच्या देशावर घाला घालणे, त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेणे, हे जर राजकारण असेल तोपर्यंत व अजूनही ते बहुतेक राष्ट्राकडून तसेच आहे असे मानण्यात येते. त्यामुळे या राजकारणात व नरकात काही फरक राहणार नाही. मॅझिनीने या नरकगामी कल्पनेपासून राजकारणाला मुक्त केले आणि राजकारण हे परमेश्वरी कर्तव्य आहे असे स्पष्ट रीतीने सिध्द केले. प्रवृत्ती आणि निवृत्ती ही तत्वे परस्परविरोधी नसून ती एकाच मार्गाच्या दोन भिन्न भागांची नावे आहेत असे त्याने प्रतिपादन केले. नरक, स्वर्ग व पृथ्वी यांच्यामध्ये विरोध आहे किंवा ती भिन्न आहेत, हे सत्य नाही. स्वर्गात सत्य व न्यायाचे ईश्वरी राज्य चालावे व पृथ्वीवर असत्य व अन्याय याचा अंमल चालावा हे बरोबर नाही. पृथ्वी ही स्वर्गाची शिडी आहे, त्यामुळे पृथ्वीवरही सत्य व न्यायाचे ईश्वरी राज्य चालावे म्हणून राजकारणाला स्वार्थाचे हिडीस स्वरूप देणा-या लोकांची चूक उघड करून मॅझिनीने फाजील धर्माभिमान्यांचा समाचार घेतला.

मॅझिनीच्या मते, धर्माने राजकारणात लक्ष घालणे आवश्यक आहे, इतकेच नव्हे तर ते त्याचे कर्तव्य आहे. राजकारण म्हणजे समाजाची, स्वदेशाची व स्वराष्ट्राची दास्यमुक्तता व संवर्धन होय. त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे मानवजातीवर आलेले भयंकर संकट निमूटपणे पाहण्याचे महापाप करणे होय. धर्माची खरी व्याख्या म्हणजे मनुष्यमात्राचे धारण करणे हे होय. मनुष्यमात्र दास्यात किंवा अनीतीत पिचत असता आपण तेवढे स्वत:स मुक्त करून घेऊ ही समजूत ढोंगीपणाची आहे. भूतदयेशिवाय स्वत:च्या मुक्तीला दुसरा मार्ग नाही. तुमची जेव्हा चौकशी होईल तेव्हा परमेश्वर तुम्हाला असे विचारणार नाही की, तुम्ही स्वत:च्या कल्याणासाठी काय केले आहे ? हे भूतमात्रांचे अंतिम कल्याण करण्यासाठी, त्यांची ज्ञानाने व पावित्र्याने आत्मोन्नती होण्यासाठी व त्यांना चांगली कृत्ये करण्यास सामर्थ्य येण्यासाठी,

त्यांची दास्यमुक्तता करणे, त्यांना स्वातंत्र्य मिळवून देणे हे प्रत्येक व्यक्तीचे धार्मीक कर्तव्य होय. जोपर्यंत एखाद्या व्यक्तीला तुरुंगात ठेवले असता तिच्या हातून चांगली कृत्ये अगर प्रगती होणे शक्य नसते, त्याप्रमाणेच एखादा देश राजकीय पारतंत्र्यात असतो तोपर्यंत त्याच्याकडून मानवी प्रगतीला मदत होणे शक्य नसते. अशा परिस्थितीत आपण सर्वजण सर्वांच्या मुक्ततेस जबाबदार आहोत. जर आपण आपल्या इतर बंधूंना पारतंत्र्यात व अज्ञानात तसेच राहू दिले तर परमेश्वराचा द्रोह केल्याचे महापाप आपल्या माथी असेल. म्हणून स्वत:ची प्रगती व मुक्तता करण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे सर्वांना मुक्ती मिळेल असा प्रयत्न करणे हा होय. मॅझिनी लिहितो की, व्यक्तीविषयक मोक्षासाठी धडपडणाऱ्या ढोंगी साधूस किंवा फाजील धर्माभिमान्यांस हे कळले पाहिजे.

म्हणून "तरुण इटली"च्या पत्रात मॅझिनी धर्मोपदेशकांस उद्देशून लिहितो की, "जेव्हा क्रांतीचा काळ जवळ आलेला असतो तेव्हा ती क्रांती न घडू देण्याची शक्ती कोणत्याही मानवी प्राण्यात नसते. ती क्रांती खुषीने किंवा सक्तीने घडून येणार असेल व तिचे प्रमुखत्व स्वीकारण्याचा मान धर्मोपदेशक स्वीकारीत नसतील, तरी ती क्रांती घडून येण्याचे थांबणार नाही. कारण लोक मग मानवी धर्मोपदेशांकडे तोंड फिरवून त्या प्रत्यक्ष धर्माचा धावा करतील. मनुष्यापुढे तोंड पसरावयाचे सोडून परमेश्वराला आळवतील. विशिष्ट वर्गाशीच परमेश्वर बोलतो व आमच्याशी बोलत नाही हे थोतांड पुरे झाले. परमेश्वर सर्वांचीच हो ऐकतो व तो आमचीही ऐकेल. पण धर्मोपदेशक ही माणसे आहेत व ते नागरिकही आहेत. हे कोणीही विसरता कामा नये की, धर्माधिकारी हे आमच्या देशाचाच एक भाग आहेत व जे आम्ही सर्वांच्या कल्याणासाठी लढत आहेत, ज्या आमच्या निशाणावर

"देव व लोक", "मानुषता व स्वदेश" हे शब्द फक्त आहेत त्या आमच्याविरूद्ध जाऊन ते स्वत:चाच नाश करीत आहेत. [२०]

मॅझिनीच्या मते, स्वदेश पारतंत्र्यात खितपत पडलेला असतो तेव्हा धर्माचाही ऱ्हास होतो. म्हणून स्वदेशाच्या, स्वधर्माच्या आणि नीतीच्या कल्याणासाठी धर्मगुरूंनी राष्ट्रीय क्रांतीकारकांना साथ दिली पाहिजे. इटलीला राजकीय पारतंत्र्यात टाकून ऑस्ट्रियाने पाप केले आहे, आणि त्याविरूद्ध आपण संघर्ष केला पाहिजे. इटलीची भूमी परमेश्वराने निर्माण केली. त्यावेळी ती स्वतंत्र होती पण आता ती पारतंत्र्यात आहे म्हणून तिला मुक्त करण्यासाठी धर्माधिकाऱ्यांनी संघर्ष केला पाहिजे. त्यासाठी मिलन शहराच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्या एका धर्माधिकाऱ्याचा मॅझिनी दाखला देतो, आणि त्यांच्या सदसद्विवेक बुध्दीस आवाहन करून मॅझिनी लिहितो, "माझ्या देशातील धर्मोपदेशकांनो, मनुष्य कर्तव्यता ओळखून, ईश्वरी आज्ञा म्हणून स्वदेश स्वतंत्र करण्यासाठी जो रणांगणावर "हरहर महादेव" उच्चारील तोच खरा धर्मोपदेशक होय. परंतु लोकांच्या स्वयंस्फूर्तीने युध्दनादाच्या अगोदर जर तुम्ही त्या रणशब्दाचा उच्चार केला नाहीतर तो परमेश्वर लोकांच्या त्या भयंकर शक्तीच्या प्रचंड स्फोटापासून तुमचे संरक्षण करो. कारण लोकशक्तीचा संताप फार भयंकर असतो. [२१]

मॅझिनीच्या मते, आयुष्य ही दैवी कामगिरी आहे. आयुष्य हे कर्तव्य आहे. आयुष्यात भिन्नता नाही, आयुष्य एकरूप आहे. परमेश्वराच्या आज्ञा परस्परविरोधी नाहीत. परमेश्वरी आज्ञा एकच आहे व ती सर्वांना सारखी लागू आहे. ती म्हणजे देशाचे स्वातंत्र्य मिळविणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे.

सावरकरांच्या मते, मॅझिनीने राजकारणाला स्वार्थाच्या तावडीतून

सोडवून त्याला ईश्वरी कर्तव्याचे स्वरूप दिले. त्या कर्तव्यासाठी प्रत्येक व्यक्तीने कसे वागावे यासंबंधी मॅझिनी लिहितो की, कर्तव्याच्या तत्वाने आत्मविश्वास वाढतो. ह्या उदात्त तत्वाने आत्मा परमेश्वराच्या ध्यानात लीन होतो. व्यक्तीच्या अंगी विलक्षण चैतन्य येते, व्यक्ती अफाट कर्मे करू शकते. या कर्तव्याच्या फलविरहीत निष्ठेने देशावीरांच्या फाशीचे खांब हे स्वर्गाकडे नेणारे जिने होतात. म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपले आयुष्य चैनीत विलासात न घालविता कर्तव्य कर्मात घालवावे. आयुष्य हे चैन नसून ते कर्तव्य आहे. राजकारणातील पायाभूत कर्तव्य म्हणजे स्वदेश स्वातंत्र्य मिळविणे हे होय. मनुष्यता, स्वदेश, कुटुंब, व्यक्ती अशा क्रमाने व्यक्तीची कर्तव्यतारम्यता आहे. या परंपरेच्या वाट्याला जी राजकीय कर्तव्ये आली आहेत त्यामध्ये स्वदेश स्वातंत्र्य हे प्रमुख कर्तव्य होय. सर्व कर्तव्ये व्यक्तीकडून पार पाडण्यासाठी अगोदर स्वदेश स्वातंत्र्य मिळविले पाहिजे. व्यक्तींची किंवा कुटुंबाची कर्तव्ये जर त्यांच्या स्वदेश-पारतंत्र्यात असतील तर ती कधीही व्यवस्थित पार पाडली जाणार नाहीत. म्हणून व्यक्तीच्या समाजाच्या व मानवजातीच्या प्रगतीसाठी देशाचे राजकीय स्वातंत्र्य मिळविणे व त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य होय. ही परमेश्वराची व धर्माची आज्ञा होय. [२२]

सावरकरांच्या मते, मॅझिनीचे राजकारण हे नीतीच्या पायावर उभारले होते. त्याने व्यक्तीच्या कर्तव्याला परमेश्वरी कर्तव्याचे उच्च राजकीय स्वरूप दिले. त्याच्या मते, "आपल्यापुढे स्वतंत्रतेचे जे कार्य आहे ते महान आहे. देवाने जे कार्य केले तेच आपण करीत आहोत, आपण लोकनिर्मिती व स्वराष्ट्र उत्पन्न करीत आहोत." तो पुढे लिहितो की, परमेश्वराने स्पष्ट शब्दात सांगीतले आहे की, "इटली हा एक स्वतंत्र देश आहे, समुद्राच्या व पर्वताच्या सीमा आपल्या दिव्य अंगूलीने आखून देवाने इटली देश "टालियनास" दिलेला

आहे. तेव्हा इटालियन लोकांचे पहिले कर्तव्य म्हणजे हया ईश्वरी आज्ञेप्रमाणे इटली देश स्वतंत्र करणे होय. "तरुण बंधूनो" स्वदेश हे परमेश्वराने आपणास दिलेले घर आहे, या घरात राहून त्याच्या आश्रयाखाली तुम्ही वाढावे व वाढत वाढत अखेर मानवजातीसह अंतिम स्वरूपाला जावे अशी त्याची इच्छा आहे. हे निसर्गनिर्मित घर इटालियनांना वाढण्यासाठी आश्रय म्हणून दिलेले असून ते परकीयांनी एक तुरुंग बनवून ठेवला आहे. म्हणून इटलीच्या पुत्राचे पहिले कर्तव्य म्हणजे स्वदेश स्वतंत्र करणे हे होय. [२३]

मॅझिनीचा राजकीय कार्यक्रम :

सावरकरांच्या मते, केवळ इटलीला स्वतंत्र करणे हाच मॅझिनीचा उद्देश नव्हता, तर त्याचा मुख्य उद्देश इटलीचे राष्ट्रीय पुनरुज्जीवन घडवून आणणे हा होता. त्यासाठी राष्ट्रीय संस्कृतीचे निर्मिती केली पाहिजे आणि लोकांना राष्ट्रीय शिक्षण दिले पाहिजे. स्वतंत्र व शक्तीमान राष्ट्र निर्माण करणे हे इटलीच्या लोकांचे कर्तव्य आहे.

मॅझिनीच्या मते इटलीचा स्वातंत्र्य लढा हा केवळ इटलीला मुक्त करणे हा नसून लोककल्याणासाठी आणि निसर्गदत्त हक्क प्राप्तीसाठीचा लढा आहे. इटलीच्या स्वातंत्र्यातून जगातील सर्व गुलाम राष्ट्रांची स्वातंत्र्यप्राप्ती जवळ येणार आहे.

सशस्त्र क्रांती करणाऱ्या "तरुण इटली"च्या कार्यकर्त्यांना उपदेश करताना मॅझिनी असे स्पष्ट करतो की, "क्रांतीकारकांनी व्यक्तीकडे पाहून काम न करता तत्वाकडे पाहून काम केले पाहिजे. ज्यांचा क्रांतीच्या तत्वावर पूर्ण विश्वास असेल त्यानांच आपल्यात सहभागी करुन घ्या व त्यांच्या मत

ऐक्यावर विश्वास ठेवा. क्रांतीचा नवीन झेंडा तोलण्याची शक्ती ज्यांच्यात आहे अशा तरुण लोकांची निवड करा. त्यांना आपली तत्वे स्पष्ट रीतीने समजावून सांगा. भूतकाळी घडलेली चूक म्हणजे तत्वांच्या जागी व्यक्तीची योजना होय, तेव्हा ही चूक सुधारा व तत्वनिष्ठा शिकवा. आपल्या प्रिय देशाला मुक्त करण्यासाठी, लोककल्याणासाठी, निसर्गदत्त हक्कासाठी व ईश्वरासाठी लढाई ऑस्ट्रियाविरुद्ध करावयाची आहे असे त्यांना कळवा. लोकांना समजावून सांगा की ज्यांचा राज्यक्रांतीवर विश्वास आहे अशा लोकांतूनच क्रांतीचे नेते निवडावेत, इटली देशाची मुक्तता ही लोकांच्या हातात असल्याने मुक्ततेसाठी एकसारखे झटत राहणे हे मुख्य शस्त्र आहे. प्रथम प्रथम अपयशास भीक न घालता धैर्य न सोडता उठावणी करीत रहावे. तडजोड करु नका. कारण ती अनीतिकारक व घातक असते. लढाईशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही, ऑस्ट्रियाशी लढाई केल्याशिवाय सुटका नाही. म्हणून शक्य तितक्या लवकर त्या लढाईचा आरंभ क्रांतीपक्षानेच केला पाहिजे. अचानक हल्ला केल्याने तुमचे असावध शत्रू भयभीत होतात व तुमचे स्नेही आशायुक्त व धैर्ययुक्त होतात. परकीय मदतीची आशा धरु नका. परकीय लोक तुम्हाला कधीही मदत करणार नाहीत. तुम्ही त्यांना दाखवून दिले पाहिजे की, त्यांच्याशिवाय तुमच्यात स्वातंत्र्य मिळविण्याची शक्ती आहे. जेव्हा उठावणी कराल तेव्हा ती उठावणी एखाद्या प्रांतातर्फे किंवा जातीतर्फे न करता सर्व इटालीच्या नावाने करा. देशाच्या नावाने उठावणी करा. जर स्वातंत्र्य तत्वासाठी राष्ट्रैक्तेच्या नावाने उठाल व स्वत:च्या सामर्थ्याचा प्रभाव दाखवाल तर सर्व लोक तुम्हाला येऊन मिळतील. त्यामुळे तुम्हाला विजय मिळेल. जरी तुम्हाला अपयश आले तरी तुमचे पुत्र तुमच्या देशावीरत्वाची प्रेरणा घेऊन तुम्ही सुरु केलेला पवित्र कार्यक्रम पूर्णत्वाला नेतील." [२४]

सावरकरांच्या मते, मॅझिनीचा राष्ट्रवाद व्यापक वैचारिक पायावर आधारलेला होता. सर्व मानवजातीची मुक्तता करण्याचा त्याचा प्रयत्न होता.

"तरुण युरोप" या संघटनेचा उद्देश युरोपातील लोकशाही चळवळींनी एकत्र आणण्याचा होता. मानवजातीच्या सर्व शक्तीचा पुर्ण विकास घडवून आणणे, सत्कार्य, भुतदया, एकी यांच्या मदतीने या विकासास चालना देणे आवश्यक आहे. परमेश्वराचे जे व्यापक नीतिनियम आहेत, त्यामध्ये सर्व लोक स्वतंत्र व समान आहेत. ते एकमेकांचे बंधु आहेत. मॅझिनीच्या मते स्वातंत्र्य म्हणजे प्रत्येकाला आपला विकास घडवून आणण्याचे, त्यासाठी साधने संपादन करण्याचे बिनबोभाट मोकळीक असणे होय. हा अधिकार व्यक्तीने दुस-या व्यक्तीलाही दिला पाहिजे. समता म्हणजे व्यक्तीचे हक्क व कर्तव्ये यांचे समान वाटप आणि प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कामाच्या प्रमाणात संपत्तीचा वाटा मिळणे होय. त्याच्या मते, बंधुत्व म्हणजे व्यक्ती-व्यक्तीत परस्परांबद्दल असलेले प्रेम होय. आपल्याशी लोकांनी जसे वागले पाहिजे तसेच आपण लोकांशीवागले पाहिजे. म्हणून मॅझिनीच्या मते प्रत्येक विशिष्टाधिकार हा समतेचा भंग आहे. [२५]

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता यावर आधारलेले लोकशाही राष्ट्र निर्माण करण्याचे उद्दिष्ट मॅझिनीने जगासमोर ठेवले होते. या विचारांना परमेश्वराच्या नीतिनियमांचे अधिष्ठान आहे असे त्यांचे मत होते.

## मॅझिनीचे राष्ट्रवादाविषयी विचार :

मॅझिनीने राष्ट्रवादाची प्रागतीक अशी व्याख्या केली. त्यांच्या मते, राष्ट्र म्हणजे सर्वांच्या संमतीने एकजीव झालेले आणि एकाच शासन-पध्दतीने शासीत असलेले लोक होत. हे लोक एका विशिष्ट प्रादेशीक

विभागात राहातात. स्वतंत्र भु-प्रदेश, सार्वभौम लोक, स्वतंत्र राज्यपध्दती, स्वधर्म, इत्यादी घटकांनी मिळून राष्ट्र बनते.

राष्ट्राचे स्वरुप :

मॅझिनीच्या मते, राष्ट्राचे स्वरुप एकात्मक असावे. कारण ऐक्या-शिवाय राष्ट्र निर्माण होऊ शकत नाही. जर इटलीत संघराज्यीय पध्दती स्वीकारली तर इटली देश स्वित्झर्लंडप्रमाणे दुर्बल बनेल. त्यामुळे त्यास इतर राष्ट्राच्या नियंत्रणात राहावे लागेल. संपूर्ण देश "एकराष्ट्र" आहे. अशी लोकांची भावना झाल्याशिवाय लोक परस्परावर प्रेम करणार नाहीत. संघराज्यीय पध्दती स्वीकारली तर इटली देश पुन्हा मध्ययुगीन अंतर्गत यादवीत जाऊन पडेल. देशाचे स्थानिक व प्रांतीक अभिमानामुळे लहान-लहान तुकडे पडतील. तसेच मत्सर वाटून पुन्हा राजे लोकांच्या जुलूमाला प्रारंभ होईल. तेव्हा राष्ट्राचे स्वरुप एकात्मक असावे. राष्ट्रैकतेस सहकार्य व सर्व-संमती यांचाच समावेश असेल. प्रत्येक प्रांताचे स्थान महत्त्वाचे मानले जाईल. अंतर्गत व्यवस्थेच्या रचनेत प्रांतांची स्वतंत्रता आदरपूर्वक राखली जाईल. परंतु राजकीय व्यवस्थेच्या रचनेत संपूर्ण देश एकात्म व केंद्रीभूत असेल. युरोपच्या चळवळीत "एकराष्ट्र" या नात्याने इटलीची भूमिका राहील. [२६]

धर्म व राजकारण :

मॅझिनीच्या मते, धर्म हा राजकारणाचा आधार होय. धर्मानेच त्यास नैतिकता प्राप्त होते. त्यांच्या मते, धर्म म्हणजे मनुष्यमायाचे धारणं करणे हे होय. मनुष्यमात्र दास्यात किंवा अनीतीत पिचत असता आपण तेवढे स्वत:स मुक्त करुन घेऊ ही समजूत चुकीची आहे. भूतदयेशिवाय स्वत:च्या मुक्तीचा दुसरा

मार्ग नाही. भूतमायांचे अंतिम कल्याण साधण्यासाठी, त्यांची ज्ञानाने व पावित्र्याने आत्मोन्नती होण्यासाठी व त्यांना चांगली कृत्ये करण्यास सामर्थ्य येण्यासाठी त्यांची दास्यमुक्तता करणे, त्यांना स्वातंत्र्य मिळवून देणे, हे प्रत्येक व्यक्तीचे धार्मिक कर्तव्य होय. जोपर्यंत एखाधा व्यक्तीला तुरुंगात ठेवले असता तिच्या हातून चांगली कृत्ये होणे शक्य नसते, त्याप्रमाणेच एखादा देश राजकीय पारतंत्र्यात असतो तोपर्यंत त्याच्याकडून मानवी प्रगती होणे शक्य नसते. अशा परिस्थितीत आपण सर्वजण सर्वांच्या मुक्ततेस जबाबदार आहोत. जर आपण आपल्या इतर बांधवांना पारतंत्र्यात राहू दिले तर परमेश्वराचा द्रोह केल्याचे महापाप आपल्याला लागेल. म्हणून स्वत:ची प्रगती व मुक्तता करण्याचा राष्ट्रधर्माचा मार्ग म्हणजे सर्वांना मुक्ती मिळेल असा प्रयत्न करणे हा होय.

त्याच्या मते, जेव्हा स्वदेश पारतंत्र्यात जाऊन पडतो तेव्हा स्वधर्माचाही -हास होतो. म्हणून स्वदेशाच्या, स्वधर्माच्या आणि नीतींच्या कल्याणासाठी सर्वांनी इटलीचे राजकीय स्वातंत्र्य मिळविले पाहिजे. इटलीला राजकीय पारतंत्र्यात टाकून ऑस्ट्रियाने पाप केले आहे. म्हणून आपण त्याच्याविरुध्द सशस्त्र संघर्ष केला पाहिजे. इटलीची भूमी परमेश्वराने निर्माण केली. तेव्हा ती स्वतंत्र होती, पण आता तिला ऑस्ट्रियाने परतंत्र केले आहे. तेव्हा परमेश्वरी आज्ञोप्रमाणे तिला इटालियनांनी स्वतंत्र केले आहे. तेंव्हा परमेश्वरी आज्ञेप्रमाणे तिला इटालियनांनी स्वतंत्र केले पाहिजे. [२७]

राष्ट्रीय स्वातंत्र्याचे महत्व आणि त्याचे मार्ग :

मॅझिनीच्या मते, व्यक्तीच्या, समाजाच्या, राष्ट्राचा सर्वांगिण विकासासाठी राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविणे आवश्यक आहे. कारण राष्ट्र

पारतंत्र्यात असेल तर लोकांना भाषण, मुद्रण, संपत्ती, व्यक्ती स्वातंत्र्य असे कोणतेच अधिकार मिळत नाहीत. त्यामुळेलोकांचा विकास न झाल्यामुळे समाजात दारिद्र्य, अज्ञान, यासारखे महाभयंकर परिणाम घडून येतात. परंतु देश स्वतंत्र असेल तर लोकांना सर्वांगिण विकासासाठी आवश्यक असणारे व्यक्ती स्वातंत्र्य, भाषण, मुद्रण, सभा, संपत्ती स्वातंत्र्य असे सर्व अधिकार मिळतात. त्यामुळे देशातील सर्व समाजाचा सर्वांगिण विकास होऊन संपूर्ण देशाचा विकास घडून येतो. म्हणून समाजाच्या आणि राष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविणे आवश्यक ठरते.

त्याच्या मते, राष्ट्रीय स्वातंत्र्य भिक्षा मागून वा नि:शस्त्र प्रतिकाराच्या मार्गाने मिळणारे नाही. त्यासाठी सशास्त्र क्रांतीचाच मार्ग स्वीकारला पाहिजे. सशास्त्र क्रांतीसाठी लोकांत प्रथम मनपरिवर्तन केले पाहिजे व नंतर शारीरपरिवर्तन घडवून आणले पाहिजे. सशास्त्र क्रांती ही जानपदाकडून जानपदासाठीच घडवून आणली पाहिजे. तेव्हाच राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळेल.[२८]

## इटलीच्या राष्ट्रवादाची उद्दिष्टे :

मॅझिनीच्या मते, इटलीचे राजकीय स्वातंत्र्य मिळविणे, इटलीचे ऐक्य घडवून आणणे, देशात लोकसत्ता, समता, बंधुता स्थापित करणे, आणि देशातील लोकांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे विश्वकुटुंबाची निर्मिती करणे इत्यादी उद्दिष्टे इटलीच्या राष्ट्रवादाची मानली. त्याच्या मते, राष्ट्रीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी इटलीत ऐक्य घडवून आणणे आवश्यक ठरते. ऐक्याशिवाय राष्ट्र शक्तीमान होऊ शकत नाही. म्हणून इटलीत राष्ट्रैक्य घडवून आणणे हे इटलीच्या राष्ट्रवादाचे मुख्य उद्दिष्ट त्याने मानले.

जोपर्यंत देश पारतंत्र्यात असतो तोपर्यंत समाजाचा व देशाचा सर्वांगिण विकास होत नाही. म्हणून समाजाच्या व देशाच्या सर्वांगिण विकासासाठी राजकीय स्वातंत्र्य मिळविणे हे इटलीच्या राष्ट्रवादाचे दुसरे उद्दिष्ट मॅझिनीने मानले. नि:शस्त्र मार्गाने स्वातंत्र्य मिळणार नाही. म्हणून स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांती करणे हे आपल्या राष्ट्रवादाचे तिसरे उद्दिष्ट मानले. स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांती करणे हे आपल्या राष्ट्रवादाचे तिसरे उद्दिष्ट मानले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील लोकांना सर्वांगिण विकासासाठी भाषण, मुद्रण, संपत्ती, सभा व्यक्ती स्वातंत्र्याचे सर्व अधिकार प्राप्त करुन देण्यासाठी, तसेच देशात समता प्रस्थापित करण्यासाठी लोकसत्ता स्थापन करणे हे मॅझिनीने इटलीच्या राष्ट्रवादाचे चौथे उद्दिष्ट मानले. मानवजातीच्या सर्व शक्तीचा पूर्ण व व्यवस्थितरित्या विकास घडवून आणण्यासाठी विश्वकुटुंबाची निर्मिती करणे हे मॅझिनीने इटलीच्या राष्ट्रवादाचे पाचवे उद्दिष्ट मानले.[२९]

## सावरकर आणि मॅझिनी :

भारतीय स्वातंत्र्याचे सशस्त्र क्रांतीवादी नेते स्वा. सावरकर आणि इटालियन स्वातंत्र्याचा प्रणेता जोसेफ मॅझिनी या दोघांत राष्ट्रीय स्वातंत्र्याचे ध्येय, विचार, कार्यपध्दती, स्वातंत्र्याचा मार्ग इत्यादी बाबतीत बरेच साम्य आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविणे हे दोघांचेही अंतिम ध्येय होते. राष्ट्रीय स्वातंत्र्य भिक्षादेहीने वा नि:शस्त्र प्रतिकाराच्या मार्गाने मिळणार नाही. अशी दोघांचीही खात्री झाली होती. म्हणून त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा स्वीकार केला.

सावरकरांच्यावर मॅझिनीच्या क्रांतीकारी विचारांचा वैचारिक प्रभाव पडला. मॅझिनीने इटलीच्या स्वातंत्र्यासाठी गुप्तमंडळे स्थापन करुन सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला. त्यासाठी त्याने राष्ट्रीय स्वातंत्र्याचे क्रांती लेख लिहून लोकांत क्रांतीसाठी मनपरिवर्तन घडवून आणले. जानपदासाठी जानपदाकडूनच ऑस्ट्रियाविरुध्द सशस्त्र क्रांती घडवून आणली पाहिजे, राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळेपर्यंत पुन्हा पुन्हा उठावणी केली पाहिजे. उठावणी ही देश-व्यापक स्वरुपात गनिमीकावा पध्दतीने केली पाहिजे. अशा प्रकारचे मॅझिनीने राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी स्फूर्तीदायक विचार मांडल्यामुळे इटलीतील लोकांनी ऑस्ट्रियाविरुध्द सशस्त्र क्रांती केली. आणि इटलीचे स्वातंत्र्य मिळविले. त्यामुळे मॅझिनीच्या क्रांतीवादी विचारांचा वैचारिक प्रभाव सावरकरांवर पडला, आणि सावरकरांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी मॅझिनीने स्वीकारलेल्या सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा स्वीकार केला.

सावरकरांना इटली आणि भारत यांच्या परतंत्र स्थितीत बरेच साम्य आढळले. दोन्हीही देशावर परकीयांची सत्ता आढळली. इटलीवर ऑस्ट्रियाची तर भारतावर इंग्रजांची सत्ता होती. इटलीतील संस्थाने जशी ऑस्ट्रियाच्या ताब्यात गेली होती. तशीच भारतातील संस्थाने इंग्रजांच्या ताब्यात गेली होती. त्यामुळे दोन्ही देशात राजकीय गुलामगिरी निर्माण झाली होती. इटलीप्रमाणे भारतातही फारशी राजकीय जागृती झाली नव्हती. दारिद्रय, अज्ञान इत्यादींनी भयंकर परिणाम घडवून आणले होते. देशातील गरीब वर्ग हा अधिकच गरीब बनत चालला होता. मध्यम वर्ग राजकारणापासून तटस्थ व उदासीन राहिला. अशा परिस्थितीत इटलीतउदारमतवादी पक्ष उदयास आला होता. या पक्षाची विचारसरणी अशी होती की, शांततेच्या कायदेशीर (नि:शस्त्र) प्रतिकाराच्या मार्गाने इटलीचे स्वातंत्र्य

मिळविता येईल. परंतु मॅझिनीच्या मते या मार्गाने आतापर्यंत हजारो वेळा फसविले आहे, तेव्हा राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचाच मार्ग स्वीकारला पाहिजे. असे विचार मांडले आणि सशस्त्र क्रांतीच्याच मार्गाने त्याने इटलीला स्वातंत्र्य मिळवून दिले. तेव्हा भारतातही इटलीप्रमाणेच उदारमतवादी पक्ष उदयास आलेले आहेत. त्यांचा राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या कायदेशीर मार्गावर विश्वास आहे. परंतु या मार्गाने स्वातंत्र्य मिळणार नाही अशी सावरकरांच्या विचार निश्चिती झाली. म्हणून त्यांनी मॅझिनीप्रमाणेच राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा स्वीकार केला.

सावरकरांच्या मते, धर्म आणि राजकारण ही दोन्ही तत्वे परस्पर विरोधी नसून ती एकाच मार्गाच्या दोन भिन्न भागांची नावे आहेत. त्यांच्या मते, राजकारण म्हणजे समाजाची, स्वदेशाची व स्वराष्ट्राची दास्यमुक्तता व संवर्धन होय. त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे मानवजातीवर आलेले संकट निमूट-पणे पाहण्याचे महापाप करणे होय. त्यांच्या मते धर्म म्हणजे मनुष्यमायाचे धारण करणे हे होय. मनुष्यमात्र दास्यात किंवा अनीतीत पिचत असता आपण तेवढे स्वतःस मुक्त करून घेऊ हे चूक आहे. म्हणून सर्वांनी सर्वांच्या मुक्ततेसाठी प्रयत्न केला पाहिजे.[३०]

सावरकरांच्या मते, राष्ट्रीय स्वातंत्र्य शांततेच्या वा कायदेशीर (निःशस्त्र प्रतिकार) मार्गाने मिळणार नाही. ज्याप्रमाणे मॅझिनीने इटलीच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला आणि ह्याच मार्गाने इटलीचे स्वातंत्र्य मिळविले, त्याप्रमाणेच भारतीय स्वातंत्र्यासाठी भारतीयांनी सशस्त्र क्रांतीच्याच मार्गाचा स्वीकार केला पाहिजे. तेव्हाच भारताला स्वातंत्र्यप्राप्ती मिळेल. त्यांच्या मते, इंग्रजांविरुध्द युध्द केल्या-

शिवाय भारत स्वतंत्र होणार नाही. युध्द करणे हे पाप नाही. जेव्हा एखाद्या सत्याचा जयजयकार करावयाचा असतो किंवा एखाद्या असत्याचा नाश करावयाचा असतो तेव्हा युध्द करणे हे पवित्र कार्य होय. भारताचे स्वातंत्र्य मिळविणे हे सत्य असून त्यासाठी इंग्रजांविरूध्द युध्द करणे हे पवित्र कार्य आहे. ही सशास्त्र क्रांती लोकांनी लोकांच्यासाठी घडवून आणली पाहिजे. तेंव्हाच देश स्वतंत्र होईलअसे सशास्त्र क्रांतीवादी विचार त्यांनी मांडले.

सावरकरांच्या मते, भारतीय स्वातंत्र्यासाठी केली जाणारी सशास्त्र क्रांती गनिमीकावा पध्दतीने केली जावी. त्यांच्या मते ज्यांना प्रबळ परकीय सत्तेचा पराभव करून स्वदेशाला स्वतंत्र करावयाचे आहे. त्यांनी गनिमीकावा युध्द पध्दतीच स्वीकारली पाहिजे. असे मॅझिनीने सांगितले आहे. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्ययुध्द हे गनिमीकावा पध्दतीनेच केले जावे कारण समर्थांच्या उपदेशातही गनिमीकावा युध्द पध्दतीवर भर देण्यात आलेला होता. छ. शिवाजी महाराजांपासून ते स्वातंत्र्यप्राप्तीच्या राजाराम महाराजांच्या पर्यंत मराठेवीरांनी ह्याच गनिमीकावा युध्द पध्दतीचा स्वीकार केला होता. म्हणून भारतीयांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी गनिमीकावा युध्द पध्दतीचा स्वीकार करावा, गनिमीकावा हा अजिंक्य आहे, तो अविनाशी आहे असे विचार सावरकरांनी मांडले. [३१]

भारताचे राजकीय स्वातंत्र्य मिळवून देशात लोकशाही सत्ता स्थापन हे सावरकरांचे अंतिम उद्दिष्ट होते. त्यांच्या मते, लोकशाही पध्दतीच देशातील लोकांना भाषण, मुद्रण, संपत्ती, सभा व व्यक्ती स्वातंत्र्य असे सर्वच सर्वांगिण विकासाचे अधिकार मिळतात. त्यामुळे समाजाचा व देशाचा सर्वांगिण विकास घडून येतो. तसेच लोकशाहीत विकासासाठी सर्व लोकांना

समान अधिकार दिले जातात. विशिष्टाधिकारांचा नाश केला जातो. त्यामुळे देशात समता निर्माण होते. लोकांना धार्मिक स्वातंत्र्य मिळते. सर्व लोक बंधुत्वाच्या व सहकार्याच्या भावनेने वागतात. म्हणून स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर देशात लोकशाही सत्ता स्थापन करणे हे सावरकरांचे अंतिम ध्येय होते. [३२]

सावरकरांच्या मते, संपूर्ण जग हे प्रगती किंवा उत्क्रांती ह्या एकाच नियमाने अनुशासित झालेले आहे. त्यामुळे सर्व जग हे एक विश्वकुटुंबच आहे. या विश्वकुटुंबातील सर्व लोक बंधूबंधू आहेत. म्हणून या विश्वकुटुंबातील मानवी शक्तीच्या पूर्ण विकासासाठी व समता प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने परस्परांशी बंधूभावाने, निष्ठेने, व सहकार्याने वागावे. तेव्हाच विश्वकुटुंबाची निर्मिती होईल. परंतु या विश्वकुटुंबाची घटना करण्यापूर्वी प्रत्येकाने स्वत:चे असे एक राष्ट्र निर्माण करावे. अशा प्रकारे विश्वकुटुंबासंबंधी सावरकरांनी विचार मांडले. [३३]

सावरकरांच्या मनावर जोसेफ मॅझिनीच्या विचारांचा खोल ठसा उमटला. अभिनव भारत पर्वामध्ये सावरकरांची राष्ट्रवादाविषयीची भूमीका बरीचशी भावनात्मक स्वरूपाची होती. देशाला स्वतंत्र करण्याची भूमिका त्यात प्रधान होती, पण स्वातंत्र्य लढयामागे आवश्यक असणारे तत्वज्ञान मुल्ये आणि ते यशस्वी करण्यासाठी आवश्यक असणारी साधने याबाबत सावरकर चाचपडत होते. जोसेफ मॅझिनीच्या राजकीय तत्वज्ञानामुळे त्यांना आपले विचार स्पष्ट-पणे करता आले. सावरकरांची हिंदी राष्ट्रवादाची भूमिका मॅझिनीच्या राष्ट्रवादावर आधारित होती. या राष्ट्रवादी दृष्टिकोनातून १८५७ चा स्वातंत्र्य समर हा ग्रंथ लिहिला.

## प्रकरण तिसरे

## संदर्भ ग्रंथ


१. सावरकर वि.दा. - जोसेफ मॅझिनी-आत्मचरित्र व राजकारण, मनोरमा प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ.क्र.१०.

२. उक्त - पृ.क्र. ११.

३. देशपांडे ~~वि.स.~~ भा.ग. - क्रांतीसूर्य सावरकर, प्रथमावृत्ती, अजय प्रकाशन, औरंगाबाद, १९७४, पृ.क्र.९०.

४. सावरकर वि.दा. - जोसेफ मॅझिनी-आत्मचरित्र व राजकारण, मनोरमा प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ.क्रं.२५.

५. उक्त, - पृ.क्र. ३४.

६. जोशी लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोश, खंड १३, पृ.क्र.९५.

७. सावरकर वि.दा. - जोसेफ मॅझिनी - आत्मचरित्र व राजकारण, मनोरमा प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ.क्रं.१९९.

८. जोशी लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोश, खंड १३, पृ.क्र. ९५.

९. सावरकर वि.दा. - जोसेफ मॅझिनी - आत्मचरित्र व राजकारण, मनोरमा प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ.क्र.१९.

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | सावरकर वि.दा. | – | जोसेफ मॅझिनी–आत्मचरित्र व राजकारण, मनोरमा प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ.क्र. ८१. |
| ११. | उक्त, | – | पृ.क्र. ८२. |
| १२. | उक्त, | – | पृ.क्र. ८४. |
| १३. | उक्त, | – | पृ.क्र. ९२. |
| १४. | उक्त, | – | पृ.क्र. ३५. |
| १५. | उक्त, | – | पृ.क्र. ३०. |
| १६. | उक्त, | – | पृ.क्र. ९६. |
| १७. | उक्त, | – | पृ.क्र. १००. |
| १८. | उक्त, | – | पृ.क्र. १८८. |
| १९. | उक्त, | – | पृ.क्र. ८८. |
| २०. | उक्त, | – | पृ.क्र. १२३. |
| २१. | उक्त, | – | पृ.क्र. १२४. |
| २२. | उक्त, | – | पृ.क्र. १३६. |
| २३. | उक्त, | – | पृ.क्र. २०२. |
| २४. | उक्त, | – | पृ.क्र. १०९. |
| २५. | उक्त, | – | पृ.क्र. १५[illegible]. |
| २६. | उक्त, | – | पृ.क्र. ८४. |

२७. सावरकर वि.दा. - जोसेफ मॅझिनी - आत्मचरित्र व राजकारण, मनोरमा प्रकाशन,मुंबई, १९९२, पृ.क्र.१७५.

२८. उक्त, - पृ.क्र. १७२.

२९. उक्त, - पृ.क्र. १०३.

३०. उक्त, - पृ.क्र. १०६.

३१. उक्त, - पृ.क्र. ८८.

३२. उक्त, - पृ.क्र. १००.

३३. उक्त, - पृ.क्र. ११९.


..........